cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१२ | सोमवार दि.२२ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### झोपडपट्टीमुक्त मुंबई चर्चाच होत नाही!

झोपडपट्टी सुधार कंत्राटासाठी गोळीबार, अशी घटना घडल्यावर तरी मंत्रालयातील प्रशासन जागे व्हायला पाहिजे होते, पण झोपडपट्टी आणि अतिक्रमणे हा सरकारच्या दृष्टीने चिंतेचा विषय नाही किंवा कोणाचेही सरकार सत्तेवर असले तरी त्याला त्याचे गांभीर्य नाही हे सातत्याने अनुभवायला येत आहे.सर्वच राजकीय पक्ष झोपडपट्टी आणि अतिक्रमणे या विषयाकडे व्होट बँक म्हणून बघत असतात

### उदय सामंतांच्या ताफ्यावर दगडफेक

यवतमाळ : यवतमाळमध्ये शिंदे गटाचे मंत्री उदय सामंत यांच्या ताफ्यावर दगडफेक झाली आहे. यवतमाळच्या राळेगावमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेदरम्यान हा प्रकार घडला आहे. एका अज्ञाताने ही दगडफेक केली आहे पाटील यांच्या प्रचारार्थ देवेंद्र फडणवीस यांची सभा आयोजीत करण्यात आली होती. या सभेला उदय सामंत देखील हजर होते. यावेळी एका अज्ञाताने त्यांच्या ताफ्यावर दगड भिरकावला, सुदैवाने यात कुणी जखमी झाले नाही. पोलिसांनी अद्यापही कुणाला अटक केली नाही. पण पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत. यवतमाळ–वाशिम येथील शेतकरीबहुल मतदारसंघातून एकनाथ शिंदे यांना पक्षाच्या पाचवेळा खासदार भावना गवळी यांना हटवून त्यांच्या जागी राजश्री पाटील यांना उमेदवारी दिली.

# अवकाळीचा धुमाकूळ, वीज पडून दोन व्यक्तींचा मृत्यू

## शेतपिकांचेही कोट्यवधींचे नुकसान; शेतकरी अस्मानी संकटामुळे अडचणीत

**लातूर । प्रतिनिधी**

**अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे अर्थकारण मोडकळीला आणलं आहे. एकाच महिन्यात तीन वेळा अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली आहे. यापूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे दोनशे हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रात नुकसान झाल होते. मात्र शनिवारी झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसानीच्या क्षेत्रात कैक पटीने वाढ झाली आहे. तब्बल दीड तास अवकाळी पावसाने जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये हजेरी लावली होती. जोरदार वाऱ्यासह झालेल्या पावसात अनेक भागात गारपीटीही झाली आहे. वीज कोसळून दोन लोकांचा आणि १३ जनावरांचा मृत्यू झाल्याने जिल्ह्याभरात हळहळ व्यक्त केली जात आहे.**

लातूर जिल्ह्यात चाकूर, निलंगा, औसा, रेणापूर तालुक्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. रबी हंगामातील पिकांची काढणी झाल्याने धोका टळला असला तरी आंबा फळपिकासह भाजीपाल्याचे अतोनात नुकसान झाले आहे. ठिकठिकाणी वीज कोसळून दोन व्यक्ती आणि १३ जनावरे दगावली आहेत. महिन्याभरात तीन वेळा अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने निसर्गाच्या लहरीपणाचा सामना लातूरकरांना करावा लागत आहे.



### नळेगाववर शोककळा

चाकूर तालुक्यातील नळेगाव येथे शेतात काम करत असताना अंगावर वीज पडल्याने सार्थक संतोष ढोले (वय २१) हा युवक जखमी झाला होता. उपचारासाठी लातूर येथील रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासणी करून मृत घोषित केले. आज त्याच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्याच्या पश्चात आई–वडील आणि एक बहीण असा परिवार आहे. तर दुसरी घटना तालुक्यातील अंजनसोंडा (खु.) येथे घडली आहे. शेतातील घराच्या पाठीमागे असलेल्या मंगलाताई अशोकराव पाटील (वय ६५) यांच्या अंगावर वीज पडली. यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला.

### भाजीपाल्यासह फळबागेचे नुकसान

लातूर भागात मोठ्या प्रमाणात केशर आंब्याच्या बागा आहेत. तसे एक्सपोर्ट क्वालिटीचे द्राक्ष लातूरमध्ये उत्पादित केली जातात. जोरदार वार आणि गारपिटीमुळे या बागेंना मोठा फटका बसला आहे. पानचिंचोली येथील शेतकरी जयराज भोसले हे प्रचंड त्रस्त आहेत. ''माझी तीन एकर वरची अंबा बाग या पावसात सापडली आणि हो त्याचं नव्हतं झाले. १७ लाख रुपये च नुकसान आहे. हा पडलेला आंब्याचा खच माझी चिता आहे अशीच उद्विग्न प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. द्राक्ष बागेलाही या पावसाचा फटका बसला आहे. ज्या लोकांनी अद्याप ज्वारी काढली नाही त्यांना या पावसामुळे नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था तर अतिशय वाईट झाली आहे.

# आज बजरंग सोनवणे उमेदवारी अर्ज दाखल करणार

## महाविकास आघाडीचे प्रमुख नेते उपस्थित राहणार

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे आज सोमवारी त्यांचे ग्रामदैवत असलेल्या सारणी येथील हनुमान मंदिरात दर्शन घेऊन प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खा. रजनी पाटील व किशोर पोतदार यांच्यासह इंडिया आघाडीच्या आजी माजी खासदार, आमदार, प्रमुख आणि जिल्हाध्यक्षांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे हे आज सोमवारी (दि.२२) सकाळी ८:०० वाजता त्यांचे जन्मस्थळ सारणी (आनंदगाव) येथील ग्रामदैवत



हनुमानाचे दर्शन घेवून सकाळी ८:३० वाजता आनंदगाव (सारणी) येथील ग्रामदैवत खंडोबाचे दर्शन घेणार आहेत. त्यानंतर सकाळी ९ वाजता रामवडगाव येथे प्रभू श्री रामचंद्र मंदिरात दर्शन घेतील. सकाळी ९:३० वाजता हनुमंत पिंपरी येथे उत्तरेश्वर मंदिरात दर्शन घेवून चाकरवाडीकडे जाणार आहेत. सकाळी ◀◀ पान २ वर

# खा.प्रितमताई मुंडे यांचा बहिणीसाठी डोअर टू डोअर प्रचार

## पंकजाताई मुंडे विकासाचे व्हिजन असलेल्या सुसंस्कृत उमेदवार; मतदारच देत आहेत विजयाची ग्वाही

**माजलगाव । प्रतिनिधी**

**भाजप आणि महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ खा.डॉ.प्रीतमताई मुंडे यांनी माजलगाव शहरातील मतदारांच्या डोअर टू डोअर भेटी घेतल्या. राज्याच्या ग्रामविकास मंत्री असताना पंकजाताई मुंडे यांनी ग्रामीण आणि शहरी भागात पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत, त्यांच्या काळात झालेली विविध विकास कामे नागरिकांचे जीवनमान उंचावणारे असल्यामुळे पंकजाताई मुंडे या बीड जिल्ह्याच्या विकासाचे व्हिजन असलेल्या, सुसंस्कृत उमेदवार आहेत, ज्यांनी विकास केला आहे आणि करण्याची क्षमता आहे अशा उमेदवार म्हणून आम्ही पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी आहोत, त्यांचा विजय निश्चित आहे अशा भावना या दौऱ्यादरम्यान मतदारांनी व्यक्त केल्या.**



लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने खा. प्रितमताई मुंडे यांनी माजलगाव शहरातील मतदारांशी भेटून त्यांच्याशी संवाद साधला. शहरातील सुरेश भानप, लक्ष्मीकांत मुंदडा, ओंकार खुरपे, ॲड.विश्वास जोशी प्रा. मगर,ॲड. लवटे, अच्युतराव लाटे यांच्या निवासस्थानी त्यांनी भेटी दिल्या. तसेच श्री मंगलनाथ मंदिर, जुना मोंढा येथे आयोजित अध्यात्मिक सोहळ्यांना उपस्थित राहून भाविकांशी संवाद साधला. ◀◀ पान २ वर


# अंबाजोगाईत ५० लाखांची चोरी

## दोन दिवसांवर घरात लग्नकार्य

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**शहरालगत असलेल्या शेपवाडी येथे अज्ञात दोन चोरट्यांनी ४८ लाख रुपयाचे नगदी व सोन्या–चांदीचे दागिन्याची धाडसी चोरी केल्याची घटना घडली असून या चोरीमुळे एकच खळबळ उडाली आहे.**


शेपवाडी येथील संदीप टेन मर्चंट या नावाने पत्र्याचे व्यापारी असलेले शेप यांच्या जवळचे भावकितील लग्न आर्य विरमंगल कार्यालयात असल्यामुळे घरातील सर्व सदस्य मंगल कार्यालय येथे गेले असता अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून चार बेडरूममधील ३० लाख रुपये नगदी व १८ लाख रुपयाचे सोन्या चांदीचे दागिने घेऊन पसार झाल्याची घटना शहरांत घडल्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले असून दोन दिवसावर पुतणीचे लग्न असल्यामुळे नगदी रोख रक्कम व



दागिने लंपास झाल्यामुळे प्रकाश शेप कुटुंबीयांवर डोंगर कोसळला आहे. ◀◀ पान २ वर

# ठाकरे गटाला निवडणूक आयोगाची नोटीस

## हिंदू धर्म आणि जय भवानी हे दोन शब्द वगळण्याची सूचना



**मुंबई । प्रतिनिधी**

ठाकरे गटाला निवडणूक आयोगाची नोटीस आली आहे. ठाकरे गटाच्या प्रचारातील मशाल गीतावरून ही नोटीस आली आहे. या प्रचार गीतातील हिंदू धर्म आणि जय भवानी हे दोन शब्द वगळण्याची सूचना निवडणूक आयोगाने ठाकरे गटाला दिली आहे. मात्र, कोणत्याही परिस्थितीत जय भवानी हा शब्द वगळणार नसल्याचे सांगतानाच आम्ही या प्रकरणी कायदेशीर लढाई लढू, असे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. ठाकरे शिवसेनेच्या प्रचारातील मशाल गीतामध्ये हिंदू धर्म आणि जय भवानी ◀◀ पान २ वर

### गाण्यात तरी वापर कशाला करता–फडणवीस

ठाकरे गटाला आलेल्या या नोटिशीवर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. ज्यांनी हिंदुत्व सोडले, त्यांनी गाण्यात तरी जय भवानी शब्द का वापरावा? असा चिमटा देवेंद्र फडणवीस यांनी काढला आहे.

# गायक आनंद शिंदेंचा आज बीडमध्ये संगीत रजनी कार्यक्रम

## रसिक बीडकरांनी बहुसंखेने उपस्थित राहावे –राजेंद्र मस्के

**बीड। प्रतिनिधी**

**गतवर्षी प्रमाणे शिव–फुले– आंबेडकर संयुक्तिक महामानवांच्या जयंती महोत्सवा निमित्त ख्यातनाम भीम गीत गायन सम्राट आनंद शिंदे यांचा बहारदार संगीत रजनीचा खास कार्यक्रम सोमवार, दि. २२ एप्रिल रोजी सायंकाळी ०७.०० वाजता बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रिंडांगण येथे संपन्न होणार आहे. महापुरुषांचे स्मरण व अभिवादन करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित असून, बंधू भगिनींनी बहुसंखेने उपस्थित राहून या शानदार कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.**



विश्ववंदनीय छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले यांच्या संयुक्तीक जयंती निमित्त महापुरुषांचे वैचारिक जागरण तथा चरित्र दर्शन त्यांच्या कर्तुत्वाची ओळख आजच्या युवा पिढीपर्यंत जावी. महापुरुषांना सन्मानपूर्वक करण्यासाठी बीड करांच्या परिचयांचे ख्यातनाम गायक आनंद शिंदे यांनी संगीत रजनीच्या माध्यामतून आपला अमुल्य वेळ दिला आहे.

कार्यक्रमा साठी भव्य व्यासपीठ, उच्च दर्जाची साउंड व्यवस्था आणि महिला पुरुष ज्येष्ठ नागरिकांना स्वतंत्र बसण्याची ◀◀ पान २ वर




**बीड : दैनिक राज्य लोकतंत्रच्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष आदित्य सारडा यांनी भेट देवून शुभेच्छा दिल्या.यावेळी कार्यकारी संपादक अशोक खाडे यांनी त्यांचे स्वागत केले.**

### उद्धव ठाकरेचं मानसिक संतुलन ढासळले

नगर : आम्ही कुठल्याही परिस्थितीत आमच्या गीतातील जय भवानी शब्द काढणार नाही. जय भवानी, जय शिवाजी ही आमची घोषणा आहे. आज तुम्ही आमच्या घोषणेतील जय भवानी शब्द तुम्ही काढायला लावत आहात, उद्या तुम्ही जय शिवाजी शब्द काढायला लावाल, ही हुकूमशाहीची पद्धत आम्ही स्वीकारणार नाही, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले होते. यावरून महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१९ एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू : ५७.०० क्विंटल | | |
| २,२५१ | ३,१५० | २,५५३ |
| ज्वारी/हायब्रिड : २४५.०० क्विंटल | | |
| १,६०० | ३,२८० | २,६२४ |
| मूग : ०.५० क्विंटल | | |
| ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : ७२.५० क्विंटल | | |
| ९,००० | १०,९०० | १०,४८४ |
| उडीद : १.५० क्विंटल | | |
| ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: २३.०० क्विंटल | | |
| १,७६१ | २,७४० | २,४१३ |
| चिंचोका/लोकल: ८.०० क्विंटल | | |
| २,४०० | २,४०० | २,४०० |
| सोयाबीन: १२५.५० क्विंटल | | |
| ४,५५० | ४,६११ | ४,५८९ |
| हरभरा: १२.५० क्विंटल | | |
| ५,००० | ६,५०० | ५,७३७ |

# नारायण गडाच्या फिरत्या नारळी सप्ताहास सुरवात

## नारायण गड ते सिरसमार्ग मोटारसायकल भव्य रॅली

• पन्नास एकराच्या मैदानावर मंडप व्यवस्था.. • ७२ व्या नारळी सप्ताहात भव्य दिव्य कार्यक्रम...

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील धाकटी पंढरी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायण गड येथील सालाबादप्रमाणे ७२ व्या नारळी सप्ताहाचे अयोजन गेवराई तालुक्यातील सिंदफणा नदी काठावरील सिरसमार्ग येथे दि.२१ एप्रिल रोजी सुरुवात झाली. यावेळी युवकांची भव्य मोटारसायकल रॅली नारायणगड ते साक्षरप्रिंपी सोनगाव पारगाव सिरसमार्ग अशी काढण्यात आली.यावेळी हभप महंत मठाधिपती शिवाजी महाराज यांचे भव्य ठीकठिकाणी स्वागत सत्कार करण्यात आले.**



बीड जिल्ह्यातील धाकटी पंढरी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायण गड येथील सालाबादप्रमाणे ७२ व्या नारळी सप्ताहाचे अयोजन गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे श्री नगद नारायण महाराज यांच्या कृपेने व वै हभप गु. महादेव महाराज यांच्या आशीर्वादाने आणि महंत शिवाजी महाराज(श्री क्षेत्र नारायणगड) यांच्या शुभहस्ते गतवर्षीप्रमाणे याहि वर्षी श्रीसंत तुकाराम महाराज संस्थान मादळमोही येथील संस्थानचे मठाधिपती श्री. संभाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाने या नारळी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून ह्या सप्ताहाची सुरवात दि.२१ एप्रिल २०२४ रोजी नारळी सप्ताह ◀◀ पान २ वर

### सुश्राव्य किर्तन अन् विविध प्रकारच्या कार्यक्रमाची रेलचेल..

या नारायण गड संस्थानाच्या वतीने गडावर वर्षभर धार्मिक सांस्कृतिक, शेतकरी हिताचे प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. यामध्ये दरवर्षी फिरता नारळी सप्ताह होत असतो. या वर्षाच्या नारळी सप्ताहाचे आयोजन दि.२१ ते २८ एप्रिल दरम्यान गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथील ग्रामस्थांनी केलेले आहे. सप्ताहात कार्यक्रमाच्या रूपरेषेनुसार भजन, किर्तन, हरिपाठ, गाथा भजन, रामायणाचार्य ढोक महाराज यांची रामायण कथा होणार आहे. या कार्यक्रमास गायनाचार्य, मृंदुगाचार्य, टाळकरी, गुणवंत मंडळी उपस्थित राहणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील आणि सिरसमार्ग पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सप्ताह समिती आणि ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### भव्य मोटारसायकल रॅली...

या नारळी सप्ताहाचे आयोजन सिरसमार्ग ग्रामस्थांकडून भव्य स्वरूपात करण्यात आलेले असून गडाचे मठाधिपती हभप शिवाजी महाराज यांच्या स्वागतासाठी नारायण गड ते साक्षळप्रिंपी– सोनगाव पारगाव, अश्या मार्गाने युवकांची भव्य मोटारसायकल रॅली सिरसमार्ग पर्यंत काढण्यात आली.

cmyk

## अग्रलेख

# झोपडपट्टीमुक्त मुंबई चर्चाच होत नाही!

झोपडपट्टी सुधार कंत्राटासाठी गोळीबार, अशी घटना घडल्यावर तरी मंत्रालयातील प्रशासन जागे व्हायला पाहिजे होते, पण झोपडपट्टी आणि अतिक्रमणे हा सरकारच्या दृष्टीने चिंतेचा विषय नाही किंवा कोणाचेही सरकार सत्तेवर असले तरी त्याला त्याचे गांभीर्य नाही हे सातत्याने अनुभवायला येत आहे.

सर्वच राजकीय पक्ष झोपडपट्टी आणि अतिक्रमणे या विषयाकडे व्होट बँक म्हणून बघत असतात म्हणून रस्त्यावरील अतिक्रमणे आणि बेकायदा झोपडपट्ट्यांचा मुंबईला पडलेला अजस्त्र विळखा कोणी हटवायला तयार नाही. लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची धामधूम राज्यात चालू आहे. पहिल्या टप्प्याचे शुक्रवारी मतदान झाले. मुंबई महानगरात व परिसरात २० मे रोजी मतदान आहे. पण या महानगरात साठ-पासष्ट लाख लोक झोपडपट्टीत वास्तव्य करीत असताना त्यांच्या प्रश्नावर कोणी बोलत नाही. कोणी हौसेने किंवा मजा म्हणून झोपडपट्टीत राहात नाही. ठिकठिकाणी झोपडपट्टी सम्राट आहेत, त्यांना पोलीस, प्रशासन व स्थानिक लोकप्रतिनिधींचे संरक्षण असल्याशिवाय झोपडपट्ट्या वसत नाहीत किंवा विस्तारीत होत नाहीत. मानवतेच्या दृष्टिकोनातून वीज, पाणी, रस्ते, स्वच्छतागृहे सर्वत्र दिलेली असली तरी त्याची जाणीव तेथील रहिवाशांना आहे का, असा प्रश्न पडतो. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला चाळीस हजार झोपड्यांचा विळखा कित्येक वर्षे पडलेला आहे. केंद्रात व राज्यात विविध पक्षांची अनेक सरकारने आली. मुंबई महापालिकेचे आणि मुंबईचे अनेक आयुक्त व पोलीस आयुक्त बदलले. मुख्यमंत्री किंवा मुख्य सचिव कितीही बदलले तरी झोपडपट्टीमुक्त मुंबई का होत नाही या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही.

आज मुंबईत एसआरए सुरू होऊन तीन दशके तरी लोटली. मुंबईत झोपडपट्ट्यांच्या जागेवर आज शेकडो बहुमजली टॉवर्स उभे राहिलेले दिसतात. एसआरए मिळविण्यासाठी राजकारणी व बांधकाम विकासक व कंत्राटदार यांच्यात जीवघेणी स्पर्धा असते. कारण त्यात कमाई प्रचंड असते. एसआरए हे भ्रष्टाचाराचे कुरण बनलेले आहे हे सर्वांना चांगले ठाऊक आहे. पण भ्रष्टाचारमुक्त एसआरए राबविण्यासाठी कोणी पुढाकार घेत नाही. झोपडपट्टी सुधार मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी चारशे कोटी रुपयांची कंत्राटे दिली जातात. झोपडपट्टीत विविध सुविधा देण्याच्या कामांचा त्यात समावेश असतो. प्रत्यक्षात किती कामे होतात हा एक अभ्यासाचा विषय आहे. जसे पावसाळ्यात रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामात वर्षानुवर्षे मोठा भ्रष्टाचार होतो तसेच झोपडपट्टी सुधार कंत्राटांच्या कामातही मोठा घोटाळा होतो. पण त्यावर उघडपणे चर्चा होत नाही.

विधिमंडळात तर एसआरए आणि झोपडपट्टी सुधार मंडळाच्या कामकाजावर कित्येक वर्षांत चर्चा झालेली नाही. राज्य सरकारच्या अखत्यारीतील महामंडळाच्या वार्षिक कामाचे अहवाल विधिमंडळाला सादर होत असतात. तीन-चार दशकांपूर्वी अशा अहवालावर विधिमंडळात तासनतास चर्चा होत असे. महामंडळाच्या कारभारावर सरकार व लोकप्रतिनिधींचा अंकुश असे. पण आता केवळ राजकारण, आरोप-प्रत्यारोप, उखाळ्या-पाखाळ्या, विरोधी पक्षाच्या आमदारांची तोडफोड यातच महाराष्ट्राचे सत्ताकारण गुंतले असल्याने मुंबईकरांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर चर्चा करायला, प्रश्न विचाराला कोणाला फारसा रस उरलेला दिसत नाही. त्यामुळेच आपल्याला कोणी जाब विचारणारे नाही, अशी भावना महामंडळातील नोकरशहांमध्ये प्रबळ होऊ लागली आहे व त्यातूनच भ्रष्टाचार वाढत आहे.

माजी मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले हे शंकरराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना राज्याचे गृहनिर्माण मंत्री होते. त्याच वेळी प्रभाकर कुंटे हे गृहनिर्माण राज्यमंत्री होते. अंतुले व कुंटे यांना मुंबईच्या प्रश्नांची चांगली जाण होती व अवाढव्य झोपडपट्ट्यांचे गांभीर्य यांना कळून चुकले होते. १९७६ मध्ये मुंबईत झोपडपट्ट्यांमध्ये जनगणना झाली. तेव्हा मुंबईत अठरा लाख लोक झोपडपट्टीत राहात होते. जनगणनेनंतर नवीन झोपड्या मुंबईत होऊ द्यायच्या नाहीत, असे ठरविण्यात आले. मुंबईत कोणत्याही भागात झोपडपट्टी वाढली तर तेथील वॉर्ड ऑफिसर व पोलीस निरीक्षक यांना जबाबदार धरले जाईल, असेही एका माजी मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते. पण त्या घोषणा हवेतच विरल्या.

आता राजकीय पक्षांना जातीनिहाय जनगणनेत जास्त रस आहे, त्यावरून त्यांना व्होट बँक समजते व आरक्षणासारखे विषय ताणून धरता येतात. देशात कोणत्याही शहरापेक्षा मुंबईतील झोपडपट्टीचा प्रश्न गहन आहे. झोपडपट्टी हे व्होट बँक व अनेकांच्या उत्पन्नाचे साधन असल्याने ती कधी कमी होत नाही हे वास्तव आहे. रेल्वे मार्गालगतच्या झोपड्या हटवायला किती त्रास होतो हे रेल्वे प्रशासनाला चांगले ठाऊक आहे. झोपडपट्टीमुक्त मुंबई हा विषय कोणत्याच राजकीय पक्षांच्या अजेंड्यावर नाही ही शोकांतिका आहे.


मुंबईतील झोपडपट्टीत नेमके किती लोक राहतात, त्यात मराठी किती व अमराठी किती, कोणत्या राज्यातून किती लोकांचे वास्तव्य झोपडपट्टीत आहे, त्यात गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले किती लोक आहेत, झोपडपट्टीत राहणाऱ्या मुलांचे भवितव्य काय, त्यांना स्वच्छ, सुंदर व सुरक्षित आयुष्य जगायला मिळावे ही कोणाचीच जबाबदारी नाही का? आजवर किती एसआरए योजना पूर्ण झाल्या, किती झोपड्या हटवल्या, तेथील किती लोकांना मोफत घरे दिली व किती लोक त्या मोफत घरांमध्ये राहतात, किती लोकांनी त्यांना मिळालेली मोफत घरे दुसऱ्याला विकली याची आकडेवारी सरकारने प्रसिद्ध करावी. शेवटी करदात्यांच्या पैशातून झोपडपट्टीवासीयांना सुविधा व सुखसोयी व त्यांचे पुनर्वसन केले जाते. एकीकडे उत्तुंग टॉवर्सनी मुंबई सजलेली दिसत असली तरी तरी दुसरीकडे अक्राळ-विक्राळ बेकायदा झोपडपट्ट्यांचा विळखा वाढतच आहे.

## बहुजन समाजाला ज्ञानयुगात आणणारे ज्योतिराव फुले दृष्टे सुधारक-बनकर

**वडवणी । पतिनिधी**

अज्ञानाच्या अंधारात खितपत ठेवणारी समाजव्यवस्था व तिचे पाळेमुळे विवेकाने नाहीसे करणारे महात्मा फुले बहुजन समाजाला न्याय ज्ञानयुगामध्ये आणणारे दृष्टी सुधारक होते असे प्रतिपादन व्याख्याते मा.परमेश्वर बनकर यांनी केले आहे ते वडवणी शहरांमधील सत्यशोधक क्रांतीसुर्य महात्मा फुले आणि संविधान निर्माते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त सार्वजनिक जयंती मध्ये बोलत होते अध्यक्षस्थानी प्रसिद्ध शिक्षण प्रेमी बुवासाहेब शिंदे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशोक खेत्री सर डॉ.सतीश भालेराव हे होते. सुरुवातीला क्रांतीसुर्य महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी शाहीर उजगरे यांनी बहरदार परिवर्तन गीताने परिवर्तनवादी विचार या गाण्याच्या माध्यमातून व्यक्त झाल्या यावेळी व्यासपीठावरील सर्व प्रमुख मान्यवरांचा सत्कार संपन्न झाला यावेळी प्रास्तविक करताना सोनाजी शिंदे यांनी जयंती डीजे मुक्त व सामाजिक उपक्रम करून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुढेही महामानवाला अपेक्षित काम आम्ही तालुक्यात उभारणार आहोत असे ते म्हणाले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणामध्ये परमेश्वर बनकर सर यांनी महात्मा फुले यांच्या जीवनामधील विविध पैलूंचा उलगडा केला आणि महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्वतःच्या राहत्या घरी बालहत्या प्रतिबंध क गृह उभारले त्याचबरोबर धनकवडी येथील दुष्काळ पिढीत विद्यार्थ्यांसाठी त्यांनी कॅम्प उभा केले .त्याचबरोबर अनाथ आश्रमाच्या माध्यमातून अनेक निराधारंचे आधारवड झाले. विधवा स्त्रियांच्या केशवपणाची प्रथा बंद करून तळेगाव ढमढेरे व ओतूर येथे नव्यांचा संप घडून आणला. गोखले बागेमध्ये विधवा पुनर्विवाह घडूनआणला. त्यांनी लिहिलेले सार्वजनिक सत्य धर्म हा सत्यशोधक समाजाचा प्रमाणग्रंथ होता .सत्यशोधक समाजाचे दीनबंधू साप्ताहिक क्रांतिकारी विचारांचे जागर करत होते. संताच्या अभंगाप्रमाणे त्यांनी लिहिलेल्या अखंड काव्यरचनेला आज सुद्धा तोड नाही .महात्मा फुले हे उत्कृष्ट गुत्तेदार होते ,उद्योगपती होते ,शेतकरी होते ,पुणे येथे त्यांनी धरणाचे बांधकाम केले उदाहरण आहे.त्याचबरोबर आजच्या तरूणाने व्यसनं पासून दुर राहण्याचा सल्ला दिला .त्याचबरोबर म.फुले यांना गुरु मानून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक क्रांतीचा मार्ग त्यांनी पुढे केला म.फुले यांनी हंटर कमिशन पुढे मोफत आणि सक्तीचे शिक्षण करावे ही मागणी केली .पुढे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या कलमात ती तरतूद करून ठेवली आहे.आणि समतेचा विचार तेवत ठेवलेबाबासाहेब व महात्मा फुले यांचे गुरू शिष्यांचे आदर्श समजाला दाखवून दिला आहे .आज आम्हाला या विचार धारेवर गरजेचे आहे.असे त्यांनी सांगितले .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अशोक खेत्री यांनी केले. त्यांनी सूत्रसंचालन करताना म.फुले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक जीवनावर कवितेच्या माध्यमातून प्रकाश टाकला. म.फुले यांच्यावर रुबाबदार गाणे रचणारे के.एस .के.महाविद्यालयाचे डॉ.खेत्री सर यांचा भव्य सत्कार करण्यात आला.या व्याख्यान व महापंगत कार्यक्रमासाठी ३००० लोकांनी लाभ घेतला.या कार्यक्रमासाठी माजी आमदार केशवराव आंधळे, बामसेफ चे मधुकर काळे,ओबीसींचे प्रदेश अध्यक्ष कल्याण आखाडे,ओबीसी नेते प्रा.वैजनाथ शिंदे, रिपाइंचे तालुका अध्यक्ष महादेव उजगरे, वंचितचे नेते भाई उजगरे,राजेश उजगरे,जिल्हा अध्यक्ष किशोर राऊत,युवा नेते संजय आंधळे, शामराव शिंदे,सावंत,पत्रकार लव्हाळे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन केले या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी म.फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बालाजी शिंदे,कृष्णा शिंदे,रमेश शिंदे,लक्ष्मीकांत शिंदे,किरण शिंदे,विशाल शिंदे,पप्पू शिंदे,चंद्रकांत शिंदे,नारायण शिंदे,सुदाम शिंदे,यादव सर,लखन घुमरे,अंगद शिंदे,ज्ञानेश्वर शिंदे,प्रदीप शिंदे,गोरख शिंदे,निरंजन गदळे,दत्ता माने,सर्जेराव तंटे,अभि शिंदे, हनुमंत शिंदे,भैया शिंदे,काळसकर, अच्युत नाईकनवरे ,परमेश्वर राऊत ,छबन शिंदे,बनकर परिवार याच्यासह वडवणी तालुक्यातील व शहरातील बहुजन बांधवानी परीश्रम घेतले .कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.तेजस शिंदे यांनी केले.

## मानवी मेंदूची अद्भुत माहिती



मेंदूचे वजन शरीराच्या वजनाच्या तुलनेत २% असते. १०० ते १२० अब्ज मज्जापेशी आणि तितक्याच आधार पेशी असतात. मानव मेंदूचा वापर आतापर्यंत १०% ते १२% करू शकला आहे. प्रत्येक शारीरिक आणि मानसिक कृती न्यूरॉन्सच्या जोडण्यामधून होत असते. मेंदूची स्मृती १००० मेमरी असलेल्या १००० gb संगणकापेक्षा जास्त असते. मेंदूमधून स्त्रावणाऱ्या हार्मोन्स वर क्षमता आणि आपला स्वभाव अवलंबून असतो. जन्मता मेंदू पूर्ण तयार होतो पण सर्व न्यूरॉन्स सुट्टे सुट्टे असतात. शरीराच्या तुलनेत ४०% ग्लुकोज आणि ऑक्सिजन एकट्या मेंदूला लागतो. ग्लुकोज आणि ऑक्सिजन हा मेंदूचा आहार आहे.मेंदूच्या कामात अडथळा आल्याने शारीरिक आजार उद्भवतात. न्यूरॉन्सच्या जोडण्या जितक्या जास्त तितकी बुद्धिमत्ता जास्त असते. मेंदूमध्ये ७ ते ११ वॅट इतकी विद्युत सतत वाहत असते, मेंदू हा एकमेव पूर्ण न समजलेला मानवीशरीराचा अवयव आहे. विचार भावना वातावरण आणि प्रत्यक्ष कृती यांच्यात योग्य तो बदल करून मेंदूचा अधिकाअधिक वापर करता येतो. मेंदूचे दोन भाग पडतात. उजवा मेंदू आणि डावा मेंदु असे दोन भाग असतात. मेंदूचा डावा भाग शरीराची उजवी बाजू आणि मेंदूचा उजवा भाग डावी बाजू चालवितो यामध्ये तार्किक लोब (frontal lobe) शारीरिक लोब (parietal lobe) भावनिक लोब (temporal lobe) दृष्टिकोनात्मकलोब occipital lobe & motor cortex, sensory cortex असे १००० केंद्रापेक्षा जास्त केंद्र आपल्या cortex area मध्ये आहेत.

उदा. ज्याप्रमाणे आपल्या कॉलेजच्या बाहेर लाईट ची डीपी असते आपल्या घरापर्यंत वायरिंग असते आणि त्यामधूनच इलेक्ट्रिक विद्युत वाहत असते. प्रत्येकाचा फ्युज वेगळा असतो त्याच फ्युज मध्ये त्याचे एरियाचं काम होते मध्ये आपले काम होत असंते तसेच मेंदूमध्ये सुद्धा आपापले काम केले जाते जसे डोळे पाहण्याचं काम करतात. नाक श्वास घेण्याचे काम करते, कान फक्त ऐकण्याचे काम करते तसेच frontal lobe मधे विचार करणे, निर्णय घेणे, गोल सेटिंग करणे, कामामध्ये सातत्य ठेवणे, नियोजन करणे, चांगल्या सवयी, व्यवहारिक नातेसंबंध, समस्या सोडवणे तसेच parietal lobe मधे शारीरिक लोब यामध्ये शारीरिक अंदाज, आत्मविश्वास,आरोग्य, स्किन संवेदना, शारीरिक नियंत्रण, आकलन करणे, शारीरिक कौशल्य, शारीरिक हालचाल. & temporal lobe यालाच भावनिक लोब असे सुद्धा म्हणतात. ऐकणे, बोलणे, संगीत, कला, भावना, एकाग्रता, भावनिक सवयी, चुकीच्या सवयी, पाठांतर मेमरी, भावनिक नातेसंबंध हे काम केले जाते.occipital lobe याला दृष्टिकोनात्मक लोब असे सुद्धा म्हणतात. यामध्ये निरीक्षण, कल्पना, संशोधन, सहसंबंध,स्वप्न पाहणे, अंदाज बांधणे,काल्पनिक नातेसंबंध असे १००० पेक्षा जास्त केंद्र कोर्टेक्स एरिया मध्ये आहेत.प्रत्येक केंद्रामध्ये वेगवेगळे काम केले जाते .आपलं शरीर फक्त ॲक्शन घेण्याचं काम करते. आपल्या मेंदूमध्ये दिवसभरात ६० ते ७० हजार विचार येतात.आपल्या मेंदूला चांगलं किंवा वाईट हे काही माहीत नसतं फक्त जसा विचार आलेला आहे. तो स्कॅन करतो आणि पुढे ढकलने व ज्या विचारांची संख्या जास्त असते त्यांच्यासाठी व एक मूळ विचार पूर्ण होण्याकरता ५४ ते ५८ पूरक विचार असतात तशाच भावना निर्माण होतात. ज्या भावनांचा साठा जास्त साठतो. तशाच आपल्याकडून कृती होत असतात आणि त्याच प्रकारे आपल्या शरीरात सहा प्रकारचे हार्मोन्स असतात हार्मोन्सच्याद्वारे आपल्या शरीर प्रतिक्रिया देत असते किंवा त्याच प्रकारे आपल्या तोंडातून शब्द सुद्धा उच्चारले जातात मग आपण दिवसभरामध्ये कोणते विचार करत असतो जर आपले विचार राग, द्वेष, चिडचिड, ईर्षा, आळस, दुःख ,भीती,काळजी, टेन्शन, ताण तणावाचे असतात की आनंद, उत्साह, आदर,प्रेम, आपुलकी, सहानुभूती, प्रोत्साहन, प्रतिसाद ,आवडी,निवडी धाडस,शौर्य, देणारे असतात. आपण आपले आत्मपरीक्षण करूया.. यानंतरच्या लेखामध्ये आपण हार्मोन्स विषयी माहिती घेणार आहोत. अधिक माहिती हवी असेल तर खालील नंबर वर कॉल करा आणि आपले मानसिक आरोग्य चांगले ठेवा किंवा स्वकीयांचे समुपदेशन करून घ्या..



समुपदेशक :::-
**मनीषा बिक्कड (घुले)**
मेंदू विज्ञान व मानसशास्त्र आधारित समुपदेशन
मो.९५४५४४०४७१

# तिहार जेलमध्ये अरविंद केजरीवाल यांच्या हत्येचा कट

## पत्नीचा भाजपावर गंभीर आरोप, त्यांच्या जेवणात..

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनिता केजरीवाल यांनी भाजपावर अनेक गंभीर आरोप केले आहेत. भाजपा तिहार जेलमध्येच अरविंद केजरीवाल यांची हत्या करण्याचा कट आखत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. तसेच अरविंद केजरीवाल यांना खाण्यात दिल्या जाणाऱ्या प्रत्येक पदार्थावर प्रशासन लक्ष ठेवत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.**

'अरविंद केजरीवाल यांच्या अन्नात कॅमेरे बसवले आहेत. त्यांनी घेतलेल्या प्रत्येक घासावर लक्ष ठेवले जात आहे. हे फार लाजिरवाणं आहे. ते शुगर पेशंट असून गेल्या



१२ वर्षांपासून इंसुलिन घेत आहेत. पण जेलमध्ये त्यांना इंसुलिन नाकारली जात आहे. त्यांना दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांची हत्या करायची आहे,' असा आरोप सुनिता केजरीवाल यांनी केला आहे. त्या इंडिया आघाडीच्या रॅलीत बोलत होत्या. पुढे बोलताना सुनिता केजरीवाल यांनी दिल्लीचे मुख्यमंत्री आणि झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना दोषी सिद्ध न करता तुरुंगात टाकल्याबद्दल विद्यमान सरकारला हुकूमशाही म्हटले. 'त्यांनी अरविंद केजरीवाल आणि हेमंत सोरेन यांना जेलमध्ये टाकले आहे. त्यांना दोषी सिद्ध न करताच जेलमध्ये पाठवण्यात आले आहे. ही हुकूमशाही आहे. माझ्या पतीचा काय दोष आहे? चांगला शिक्षण, आरोग्य सुविधा देणे ही चूक आहे का?,' अशी विचारणा सुनिता केजरीवाल यांनी केली आहे. अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीतील लोकांसाठी आपला जीव पणाला लावला आहे, असेही त्या म्हणाल्या.

## माजलगावात होणार अंजली जैन यांचा 'जैन भागवती दीक्षा महोत्सव'

**माजलगाव । प्रतिनिधी**

जैन धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी, भगवान महावीरांचे उपदेश जन माणसांपर्यंत पोहोचविण्यासाठी व स्वतःच्या आत्म कल्याणसह जनकल्याण करण्यासाठी छत्रपती संभाजीनगरची अंजली जैन वयाच्या १५ व्या वर्षी 'जैन भागवती दीक्षा' ग्रहण करून संयम मार्ग अंगीकारणार आहे. हा दीक्षा महोत्सव दिनांक २८ एप्रिल २०२४ रोजी माजलगाव येथील शिवप्रताप मंगल कार्यालय येथे सकाळी ९ वाजता होणार आहे अशी माहिती प.पू.प्रतिभाकंवरजी म.सा. यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, दीक्षा म्हणजे पंच महावृत्तांचे पालन करणे आहे जसे की, सत्य, अहिंसा, अचौर्य, ब्रह्मचर्य, अपरिग्रह या पंचमहाव्रतांचे कठोर पालन करण्यासाठी अंजली जैन ही जैन दीक्षा ग्रहण करत आहे. जैन दीक्षा ग्रहण करण्यासाठी कुठल्याही वयाची, जात किंवा धर्माची अट नसल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. अंजली यांनी जैन धर्मातील विविध आगमांचे अभ्यास, प्रतिक्रमण, जैन धर्माचे विविध सूत्र पाठांतर केल्यानंतर व संयम मार्गावर जाण्यासाठी परिपक्व झाल्यानंतर त्यांचा दीक्षा महोत्सव माजलगाव येथे संपन्न होत असल्याचे त्यांनी सांगितले. माजलगाव नगरी ही खूप पुण्यवान आहे त्याचे कारण की, इथे २२ साधू संतांच्या उपस्थितीमध्ये व या सर्वांच्या आशीर्वादाने अंजली यांचा दीक्षा महोत्सव संपन्न होणार आहे.

## पान १वरून...

### आज बजरंग सोनवणे

१० वाजता चाकरवाडी येथे संत श्री माऊली महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेवून सकाळी ११:०० वाजता बीड येथील राष्ट्रवादी भवनामध्ये उपस्थित राहणार आहेत. दुपारी १ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार चे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, राष्ट्रीय काँग्रेसच्या राज्यसभा सदस्य खासदार सौ. रजनीताई पाटील, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बीड जिल्हा संपर्क प्रमुख किशोर पोतदार आणि इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार , शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट , राष्ट्रीय काँग्रेस, आप, पँथर्स रिपबलिकन पक्ष, डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया , समाजवादी पार्टी, शेकाप, भाकप, माकप या सर्व मित्र पक्षांचे आजी-माजी आमदार व खासदार, जिल्हाध्यक्ष व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज (नामनिर्देशन पत्र ) सादर करणार आहेत. यानंतर १.३० वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि प्रमुख पदाधिकारी हे राष्ट्रवादी काँग्रेस भवन बीड येथे उपस्थित राहून पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत.

-------------

### अंबाजोगाई ५० लाखाची

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी-प्रकाश विष्णुपंथ शेप वय ३८ व्यावसाय रा. शेपवाडीता. अंबाजोगाई जि. बीड दिनांक २०/०४/२०२४ रोजी सायंकाळी १९.३० ते २२.४५ वाजण्याच्या दरम्यान फिर्यादीचे राहते घरी शेपवाडी येथे गेला माल-१)३ ३९,५४,५००/- प्रकाश शेप यांचे बेडरुम मधील कपाटातील ठेवलेल्या ५००रु दराच्या एकुन ६००० नोटा एकुन ३०.००००० लाख रुपये, सोने लॉकेट तीन तोळे ब्रासलेट चार तोळे अंगठ्या पाच पाच तोळे १२ तोंळे प्रति तोळा किमंत ४५.०००रु प्रमाणे एकुन किमंत ५,४०००० रुपये/- व दुसऱ्या कपाट ठेवलेल्या ५००रु दराच्या १०० नोटा एकुन ५०,००० रुपये व सोण्याचा पाच तोळ्याचा हार, झुबंर दिड तोळा, कानातील वेल सात ग्राम, लहान मुलाच्या गळ्यातील सोण्याचे ९ ग्रामचे पान एकुन सोने आठ तोळे एक ग्राम एकुण किमंत प्रत्ति तोळा किमंत ४५.०००० हजार प्रमाणे ३,६०,००० रुपये/- एकून ३९,५४,५०० रु. ४) २,२०.०००/-विष्णुपंथ शेप यांचे बेडरुम मधील कपाटातील ठेवलेल्या ५००रु दराच्या एकुन ४४० नोटा एकुन २.२०.००० रुपये, एक सुटकेस ज्या मध्ये नाव नोंदणीचे कागदपत्र व सोण्याच्या पावत्या २,७५.०००/- चंद्राकंत यांचे बेडरुम मधील कपाटातील ठेवलेल्या ५०० रु दराच्या एकुन १०० नोटा एकुन ५०,००० रुपये /- सोने दोन अंगठ्या दोन तोळ्याच्या लॉकेट तीन तोळे प्रती तोका ४५.००० रुपये प्रमाणे २,२५.००० रुपये/- एकूण २७५०००/- रु. ५) ३,६०.०००/- संदिप शेप यांचे बेडरुम मधील कपाटातील सोने गंठन तीन तोळे, लॉकेट तीन तोळे दोन अंगठ्या दोन तोळ्याच्या एकुन आट तोळे प्रती/ तोळा ४५.००० रुपये प्रमाणे ३,६०.००० रुपये एकुन नगदी रुपये व सोण्याचे दागिणे एकूण ४८,०९,५०० रुपये/- वरील ता. वेळी व ठिकाणी यातील अज्ञात दोन चोरट्याने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करुन घरातील चारही बेडरुम मधील वरील वर्णानाचे किमंतीचे तीस लाख नगदी व अठरा लाख रुपये सोण्याचे दागिने चोरुन नेले आहे. म्हणुन अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन ठाण्यात गुर न/२०२४ वर्षे कलम ४५७,३८० भा द वि नुसार झाला आहे पुढील तपास पो. उप. नि. पवार हे करत आहेत. श्वान पथकाची मदत तोंडाला पांढरे रुमाल बांधलेल्या दोन चोरट्या शोध घेण्यासाठी पहाटेच श्वान पथकाचे बोलवण्यात येऊन तपासास दिशा मिळाल्या नुसार पोलीस वेगवेगळे पथक नेमून या चोरीचा तपास करत आहेत.

-------------

### ठाकरे गटाला निवडणूक

या शब्दांचा वापर करण्यात आला आहे. या दोन शब्दांवर आक्षेप घेत निवडणुकविभागाने ठाकरे गटाला नोटिस बजावली आहे. या नोटीसमध्ये हिंदू धर्म आणि जय भवानी हे दोन शब्द वगळण्याबाबत सांगण्यात आले आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत हे दोन शब्द वगळले जाणार नाहीत, अशी भुमिका उध्दव ठाकरे यांनी घेतली आहे. वेळप्रसंगी न्यायालयीन लढाई लढणार असल्याचेही ते म्हणाले.

---------------

### गायक आनंद शिंदेंचा आज

व्यवस्था करण्यात आली आहे. हजारो श्रोत्यांच्या साक्षीने संगीत रजनीचा कार्यक्रम बहारदारपणे संपन्न होईल. निवडणूक आचार सहितेमुळे हा कार्यक्रम बरोबर सायंकाळी ०७ वाजता सुरु होईल. याची दखल घेऊन रसिक बांधवांनी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

--------

### नारायण गडाच्या फिरत्या नारळी

गडाचे मठाधिपती हभप महंत शिवाजी महाराज यांच्या शुभहस्ते झाली. यावेळी हभप भानुदास महाराज शास्त्री, संभाजी महाराज, हभप धुराजी महाराज कोळेकर, ज्योतीताई विनायकराव मेटे, माजी मंत्री बदामराव पंडित, नारायण गडाचे विश्वस्त सदस्य प्रा. जे. पी.शेळके, अँड. महादेव तुपे, बळीराम गवते, सीए. बी.बी. जाधव, राजेंद्र मस्के, गोवर्धन काशिद, बळीराम चव्हाण, बुरसुले नाना, नारायण काशीद, पंढरीनाथ लगड, पत्रकार डॉक्टर बाळासाहेब पिंगळे, पत्रकार संदीप लवांडे, पत्रकार अनिलराव जाधव, सरपंच सुरेश मारकड, युवा उद्योजक गणेश नलवडे, प्रदीप डोंगरे, पत्रकार निवासी संपादक उत्तम हजारे, दिनेश गुळवे, बाळासाहेब घाडगे, अविनाश गवळी, बाळासाहेब सानप, रोहित लंबे, राहुल लोंढे, संतराम जोगदंड, नारायण बहिर,सुशीला मामी परदेशी, माजी सरपंच सोमेश्वर गचांडे, पांडुरंग कोळेकर, संभाजीराव पवळ, सुभाषराव पवळ, भक्ती कोळेकर, राजेश ओस्तवाल, भारत कोळेकर,अनिल पवळ, बाळूदेवा आर्वीकर, बबन देवा जोशी, बडू जोशी.... यासह श्री क्षेत्र नारायणगड फडातील वारकरी, टाळकरी, मृदुंगचार्य, गायक भजनाचार्य यांच्यासह सिध्देश्वर महाराज गाडे, राजाभाऊ गवते, लक्ष्मण महाराज, नवनाथ काशीद आदी मान्यवरांसह संत महंत, हजारो महिला पुरुष युवक भाविक भक्तांची गर्दी होती.

**सनई तुतारी ढोली बॅन्ड वाजत गाजत रथातून मिरवणूक**

गावातील महिलांनी सडा रांगोळी काढून औक्षण स्वागत केले. तोफेची अताषबाजी घोषणांचा निनाद गावकऱ्यांनी आणि पंचक्रोशीतून पंधरा वीस गावातील नागरिक उपस्थितीत ढोली पथक, झांज पथक, बॅन्ड बाजा सनाई तवाजवत गाजवत भव्य दिव्य अशी रथातून मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये पन्नास एकराच्या मैदानावर मंडप उभारण्यात आला आहे. भजन किर्तन कार्यक्रमासाठी श्रवण करण्यासाठी आसन व्यवस्था, अन्नदान छत्र, पिण्याच्या पाण्याची सोय, पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. उत्कृष्ट नियोजन अन् सेवेसाठी तत्पर दिसून आली.

------------

### खा.प्रितमताई मुंडे यांचा बहिणीसाठी

पंकजाताई मुंडे यांनी शासनाच्या विविध हेड अंतर्गत आपल्या जिल्ह्यासाठी अभूतपूर्व विकासनिधी मंजूर करून आणला होता. त्यांच्या माध्यमातून सुरु असलेली विकासकामांची प्रक्रिया यापूढेही निरंतर सुरु ठेवण्यासाठी पुन्हा एकदा पंकजाताईंना लोकप्रतिनिधी म्हणून संधी दया आणि त्यांच्या पाठीशी मतदानरुपी आशीर्वाद उभे करा' असे आवाहन खा. प्रितमताई मुंडे यांनी मतदारांना केले. भाजप नेते रमेश आडसकर, अरुण राऊत,तुकाराम येवले, राहुल जगताप,डॉ. अशोक तिडके, सुरेश दळवी,दीपक मुंडे, शरद यादव,ईश्वर खुरपे, सुशांत जाधवर,दत्ता महाजन यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते यादरम्यान उपस्थित होते.

**विश्वकर्मा संघटना पंकजाताई मुंडे यांच्यासोबत**

माजलगाव तालुक्यातील विश्वकर्मा संघटनेची खा.प्रितमताई मुंडे यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली. पंकजाताई मुंडे या अठरा पगड जातींना सोबत घेऊन चालणाऱ्या, सर्वांना विकासाच्या प्रवाहात सामील करणाऱ्या नेत्या आहेत. माजलगाव तालुक्यातील विश्वकर्मा संघटना सर्वसमावेशक उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या सोबत असून त्यांना अभूतपूर्व मताधिक्य मिळवून देण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत अशी ग्वाही यावेळी पदाधिकाऱ्यांनी खा. प्रितमताई मुंडे यांच्या समक्ष दिली. तत्पूर्वी खा. मुंडे यांनी भगवान विश्वकर्मा यांच्या मंदिरात दर्शन घेतले.



२१ एप्रिल हा दिवस 'नागरी सेवा दिवस' म्हणुन साजरा केला जातो. यानिमित्ताने आज जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांचे माहिती अधिकारी अंजु निमसरकर यांनी पुष्प गुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. प्रकल्प संचालक संगीता देवी पाटील यांना बीड नगर परीषदेच्या मुख्य अधिकारी निता अंधारे यांनी पुष्प गुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी उपजिल्हा निवडणुक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे उपस्थित होते

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



# मतदान करणे आपला हक्क; मतदानाचा टक्का वाढवा

**बीड । प्रतिनिधी**

मतदान करणे हा आपला हक्क आहे. ३९ बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक १३ मे रोजी मतदान आहे. या दिवशी मतदानाचा हक्क बजावून आपल्या मतदारसंघातील मतदानाचा टक्का वाढवावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले.

आज रविवारी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात ३९ बीड मतदारसंघातील मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध विभागांची बैठक आयोजित केली, यावेळी त्या संबोधित करीत होत्या. याबैठकीस जिल्हा परिषदेच्या प्रकल्प संचालक संगीता देवी पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, स्वीपचे नोडल अधिकारी डॉ. विक्रम सारूक उपस्थित होते. जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी आपापल्या स्तरावरून प्रत्येकांनी चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी बीड लोकसभा मतदार संघात होणाऱ्या मतदानाच्या दिवशी मतदानाचा टक्का वाढविण्याचे आवाहन करुन, स्वतः मतदान



## जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे आवाहन

करणे आणि इतरांना मतदान करण्यासाठी जागरूक करणे हे आपले नैतिक कर्तव्य असून ते पार पाडावे असे, त्या यावेळी म्हणाल्या. यासह आपण सर्व शासनाचा भाग आहोत. निवडणुकीच्या एकूण प्रक्रियेमध्ये विविध जबाबदारी आपण पार पाडत आहोत. त्यामुळे मतदानाचा प्रचार प्रसार करणे हे आपले आद्य कर्तव्य असल्याचेही त्यांनी यावेळी आग्रहपूर्वक सांगितले. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले.याप्रसंगी पोस्ट ऑफिस, राष्ट्रीय तसेच मान्यताप्राप्त बँक, राज्य परिवहन महामंडळ, आरटीओ, एलआयसी यांनी त्यांच्या कार्यालयात बॅनर, सेल्फी पॉईंट, स्टॅम्प च्या माध्यमातून ३९ बीड मतदारसंघात १३ मे रोजी होणाऱ्या निवडणुकी विषयक ग्राहकांमध्ये करीत असलेल्या प्रचार प्रसारबद्दलची माहिती संबधित कर्मचाऱ्यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांमध्ये मतदान जागृती मोहीम राबवित आहेत. याअंतर्गत रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, मतदारांना जागृत करण्याची शपथ, मतदान करण्याचे आग्रहाचे निमंत्रण, प्रभात फेरी, आई-वडिलांना पोस्टकार्डने पत्र लिहून मतदानासाठी प्रवृत्त करने. असे नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू असल्याची माहिती गट शिक्षणाधिकारी गजानन सोनवणे यांनी दिली.यासह शासनाच्यावतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने 'सेल्फी विथ सिग्नेचर' ही यशस्वी मोहीम राबवली गेली. आकाशवाणीवर जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधीक्षक, स्वीप नोडल अधिकारी यांच्या मुलाखती येत्या काळात प्रसारित होणार आहेत, माहिती कार्यालयाच्यावतीने फेसबुक, एक्सच्या माध्यमातून मतदान जागृती केली जात असल्याची, माहिती अधिकारी अंजू निमसरकर यांनी सांगितले.यासह येत्या काही दिवसात जिल्ह्यात मतदानाचा प्रचार प्रसार करण्यासाठी 'मेगा इव्हेंट्स' आयोजित केले या अंतर्गत सायक्लोथॉन, मानवी साखळी असे उपक्रम राबवण्यात येतील असल्याचे स्वीपचे नोडल अधिकारी डॉ.सारूक यांनी सांगितले.

मतदार स्तनदामाता तसेच गरोदर महिलांसाठी असणार विशेष व्यवस्था

मतदानाच्या दिवशी बीड जिल्हयात स्तनदा माता तसेच गरोदर महिलांसाठी विशेष व्यवस्था केली जाईल. या अंतर्गत मतदानाच्या ठिकाणी तात्पुरती अंगणवाडया तयार करून लहान बालकांना खेळणी तसेच मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिले जातील. या ठिकाणी स्तनदा माता तसेच गरोदर महिला त्यांचा मतदानाचा क्रमांक येईपर्यंत येथे थांबू शकतील, अशी माहिती प्रकल्प संचालक श्रीमती पाटील यांनी दिली.

मतदार नागरिकांनी समाज माध्यमांद्वारे १३ मे चा प्रचार करावा

मतदान करणे हा नागरिकांचा हक्क आहे यासाठी मतदारांनी मतदारांमध्ये प्रचार प्रसार करण्यासाठी विविध समाज माध्यमांचा वापर करावा. यामध्ये मोबाईलवर डी.पी., स्टेटस, रिल्स, फेसबुक, शॉर्ट, इंस्टाग्राम या आणि अन्य समाज माध्यमांचा उपयोग करून सोमवार दिनांक १३ मे २०२४ रोजी मतदानाच्या हक्क बजावण्याचा प्रचार प्रसार करावा असे, आवाहन, जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आज केले.

# जनाबाई नाईकनवरे यांचे निधन

**पाटोदा । प्रतिनिधी**

शहरातील मालेगल्ली भागातील रहिवासी जनाबाई महादेवराव नाईकनवरे यांचे दिनांक २१ एप्रिल पहाटे ह्रदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.



मृत्युसमयी त्यांचे वय ८५ वर्ष होते. त्यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे त्या परिसरात प्रसिद्ध होत्या त्यांच्यावर पाटोदा स्मशानभूमी येथे रविवारी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सूना, नातवंडे, असा मोठा परिवार आहे. येथील पत्रकार सुनील नाईकनवरे यांच्या त्या आई होत्या. अंत्यसंस्कार प्रसंगी शहरातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी, पत्रकार उपस्थित होते.

# पर्यावरण संवर्धनासाठी महिला सरसावल्या पाच क्विंटल प्लास्टिकचे रिसायकलिंग

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

पर्यावरण संवर्धनासाठी व अंबाजोगाई शहरातील प्लास्टिक कमी करण्यासाठी महिला सरसावल्या आहेत.प्रभागातील महिलांशी संपर्क करून व शाळांमधील मुलांच्या माध्यमाने 'सागर मित्राची ' स्वच्छ व कोरडे प्लास्टिक जमा करण्याची संकल्पना रुजवून घराघरातील प्लास्टिक गोळा केले आहे यासाठी भगीनी निवेदिता गटातील सदस्यांनी शाळांमध्ये जाऊन मुलांना प्लास्टिक गोळा करून ठराविक दिवशी शाळेत आणण्याचे आवाहन करत असून

या कार्यासाठी अंबाजोगाई नगर परिषदेचे स्वच्छता विभागाचे कर्मचारी सहकार्य करत आहेत. या गटातील दीपाली माहोरकर,डॉ.शुभदा लोहिया,डॉ.गौरी कुलकर्णी,डॉ.नयन देशमुख,डॉ.प्रिया मुळे, तिलोत्तमा पतकराव,मनीषा वालेकर ,डॉ.सीमा लोमटे,प्रतिभा अष्टपुत्रे,सारिका गुंडरे,उमा दिक्षित,सविता लोमटे यांनी जमा केलेले कोरडा



प्लास्टिक कचरा रिसायकल करण्यासाठी पाठवले आहे हे कार्य असेच पुढे चालू ठेवायचे आहे यासाठी आपापल्या घरी कोरडे प्लास्टिक जमा करून ठेवल्यास घेऊन जाण्याची व्यवस्था करण्यात येईल. त्यामुळे जास्तीत जास्त शाळा व नागरिकांनी यात आपला सहभाग द्यावा व सहकार्य करावे असे आवाहन या गटातील सदस्यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील वाढत्या बेरोजगारीला पुढारी जबाबदार

## पाणीच नाही तर उद्योग येणार कुठून -ॲड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात बेकारी प्रचंड प्रमाणात वाढली आहे. याला जिल्ह्यातील पुढारी जबाबदार असल्याचा आरोप जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केला आहे. तर दुसरीकडे त्यांनी जिल्ह्यात पाणीच नाही तर उद्योग येणार कुठून ? असा प्रश्न उपस्थित केला आहे.



बीड जिल्ह्याला लागून असलेल्या अहमदनगर पासून पुण्याला जाईपर्यंत उद्योग काय असतात, एम.आय.डी.सी. काय असते, हे जिल्हातील पुढारी जाताना पाहतात. परंतु तशा पद्धतीचा विकास करण्यासाठी कोणीही पुढे येत नाही.

जालना आणि छत्रपती संभाजी नगर मध्ये देखील मोठ्या प्रमाणात उद्योगाची उभारणी झाली आहे. लातूर देखील मागे राहिलेले नाही. अशा परिस्थितीत मराठवाड्यातील सर्वात मागासलेला बीड जिल्हा आहे. जिल्ह्यातील राजकरण्यांची मानसिकता याला जबाबदार आहे. विकासाच्या मुद्द्यावर एकत्र तर येत नाहीत. परंतु सत्ता आल्यानंतर देखील विकासावर भांडत नाहीत आणि विकास खेचून आणत नाहीत, हे जिल्ह्याचे दुर्दैव आहे.

जिल्ह्यात पाण्याच्या अनेक योजना आल्या. त्यावर कोट्यावधी खर्च केले. जलजीवन सारख्या योजनांमध्ये पुढाऱ्यांनी केलेल्या अंधाधुंद कारभारामुळे त्यावेळी अनेकांवर गुन्हे दाखल झाले. मात्र तरीही विरोधक यावर बोलत नाहीत. या चौकशी आजही चालू आहेत. त्यामुळे जनतेने याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. जिल्ह्यात पाणीच नाही तर उद्योगधंदे येणार कुठून ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील वाढत गेलेल्या बेरोजगारीला आणि गुन्हेगारीला राजकारणी जबाबदार आहेत, हे नाकारता येत नाही. त्यामुळे मत मागायला येणाऱ्याला बेरोजगारांसाठी तुमच्याकडे कोणती योजना आहे. आजपर्यंत तुम्ही काय केले ? यावर प्रश्न विचारा. त्याचबरोबर उद्योग धंद्याच्या उभारणीसाठी असणाऱ्या पायाभूत सुविधा तुमच्याकडे आहेत का ? यावरही प्रश्न विचारा, असे आवाहन ॲड. अजित देशमुख यांनी केले आहे.

# आजच करून घ्या आपल्या जनावराची ऑनलाईन नोंद -डॉ.विजय देशमुख

**माजलगाव । प्रतिनिधी**

पशु संवर्धन विभाग मार्फत असे आव्हान करण्यात येत आहे की सर्व शेतकरी पशुपालक यांनी आपल्या जवळ असणाऱ्या मोठी जनावरे आणि लहान जनावरे यांची नोंद आपल्या नजीकच्या पशु वैद्यकीय दवाखाना येथे करून घ्यावी व आपल्या जनावराचा कानात बिल्ला मारून त्याचा १२ अंकी बिल्ला क्रमांक ची ऑनलाईन नोंद झाली आहे याची खात्री करून घ्यावी, नोंद करते वेळेस त्या शेतकऱ्याला त्यांचा नोंदणीकृत मोबाईल नंबर वर ओटीपी येईल तो ओटिपी फक्त त्या पशु वैद्यकीय दवाखान्यातील कर्मचारी यानाच सांगून आपल्या जनावराची ऑनलाईन नोंद पूर्ण करून घ्यावी.

तुमच्या जनावराची ऑनलाईन नोंद असेल तरच तुम्हाला इथून पुढील लाभ घेता येणार आहे. दुष्काळ ग्रस्त परिस्थिती मध्ये चारा अनुदान मिळवण्यासाठी, जनावरे एका जागेवरून दुसरीकडे वाहतुकीसाठी, खरेदी विक्री साठी, औषधोपचार घेण्यासाठी, लसीकरण साठी या सर्व गोष्टी साठी तुमच्या जनावराचा कानात बिल्ला असणे तसेच त्याची ऑनलाईन नोंद असणे गरजेचे आहे.

पशुधनाची नोंद घेण्यासाठी पशु वैद्यकीय दवाखाना मधील कर्मचारी गावोगावी येत आहेत त्यांना सर्व शेतकरी यांनी सहकार्य करून त्या गावातील नोंदी पूर्ण होतील याची काळजी घ्यावी जेणेकरून कोणताही पशुपालक यापासून वंचित राहणार नाही.

आपल्या नावावर असणाऱ्या जनावराची ऑनलाईन नोंद तपासण्यासाठी शेतकरी यांनी १९६२ ॲप डाऊनलोड करून घ्यावे. आपल्या नोंदणीकृत मोबाईल नंबर वरून लॉग इन केल्यास तुम्ही तुमचा जवळ असणाऱ्या सर्व जनावराची माहिती घेऊ शकता तसेच या ॲप मार्फत आपण जनावराची खरेदी विक्री, जनावरांचा संपूर्ण आहार नियोजन, घरगुती औषधोपचार यासारखी माहिती सुद्धा या ॲप मध्ये उपलब्ध आहे.

# राष्ट्रवादी ग्रंथालय विभागाची बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

विकासनामा प्रतिनिधी:- बीड लोकसभा निवडणूक २०२४ च्या भाजपा व महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र ग्रंथालय विभागाचे राज्य सरचिटणीस विजय दादा पोकळे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हा राष्ट्रवादी ग्रंथालय विभागाची पंढरी कॉम्प्लेक्स येथे बैठक घेण्यात आली त्यावेळी राष्ट्रवादी ग्रंथालय विभागाचे जिल्हाध्यक्ष बालासाहेब फपाळ पाटील



उपस्थित होते या बैठकी प्रसंगी विजय दादा पोकळे यांनी सांगितले की बीड लोकसभा निवडणूक २०२४ च्या महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजा गोपीनाथ मुंडे यांना भरगच्च मतांनी निवडून आणायचे असून प्रत्येक ग्रंथालय पदाधिकारी यांनी सर्व मतदारापर्यंत जाऊन सर्वांना मतदान करण्यास विनंती करायची आहे व तसेच दिनांक २३/ ४/ २०२४ रोजी दुपारी दोन वाजता राष्ट्रवादी ग्रंथालयाच्या प्रदेशाध्यक्षा रिताताई बाविस्कर बैठकीस उपस्थित राहणार आहेत त्यावेळी प्रत्येकाने आपल्या राष्ट्रवादी ग्रंथालयाचे पदाधिकारी यांना सोबत घेऊन यायचे आहे असे सांगण्यात आले या बैठकीला

बीड तालुका अध्यक्ष अनिता आदापुरे सचिव रेखा खंडागळे सामाजिक कार्यकर्त्या स्नेहा खंडागळे बीड शहराध्यक्ष नसरीन बागवान अल्पसंख्याक सेलच्या बीड शहराध्यक्ष तसलीम बेलदार ग्रंथालय विभागाचे गेवराई तालुका अध्यक्ष मिठू गुजर नंदिनी ओवाळ व कल्याणी आदापुरे पाटोदा तालुका अध्यक्ष नीलम आहिवळे आदी पदाधिकारी उपस्थित होते व तसेच दिनांक २३/ ४/ २०२४ मंगळवार रोजी दुपारी दोन वाजता एमएसईबी ऑफिसच्या समोर व गुडलक हॉटेलच्या बाजूला भाजपा कार्यालय जालना रोड बीड येथे बैठक होणार आहे तरी सर्व ग्रंथालय पदाधिकारी यांनी वेळेवर येऊन उपस्थिती लावावी.

# भारतीय तरुणाईमुळे देशाचा अमृतकाल-उदय निरगुडकर

**बीड । प्रतिनिधी**

''इंटरनेट'' हे २१ व्या शतकातील महासागर आहे, यात नौकायान करणारे सर्वात जास्त भारतीय आहेत. ५५ कोटी ची श्रमशक्ती मधील ५५ लाख आयटीमध्ये १३५ बिलियन डॉलर्स एक्सपोर्ट संपत्ती मिळवणारा आपला देश आखाती देशातील तेल उत्पादन संपत्तीपेक्षा मोठी उलाढाल आपल्या तरुणाईमुळे आहे. ५ पेक्षा १०० पटीने जास्त सिक्स जी येत आहे, यात दोनशे तरुणांनी पेटंट घेतले त्यातील मराठवाड्यातील तीन तरुण आहेत, जी सामान्य शेतकरी शेतमजूर शिक्षक कुटुंबातून आलेली आहेत. ही तरुणाई प्रश्नाचा भाग नाहीतर उत्तराचा भाग बनत आहेत. देश २० ४७ पर्यंत विकसित भारताच्या अमृतकाल शिखरावर पोहोचणारा आहे.असे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार व विचारवंत उदय निरगुडकर यांनी सौ

के .एस.के .महाविद्यालयात युवकांसमोर व्याख्यान देतांना केले.

पुढे बोलतांना ते म्हणाले की निवडणूक हा महत्त्वाचा दस्तऐवज असतो. मतदान आणि निकाल यातून त्या -त्या काळची स्थिती लक्षात येते, इतर राष्ट्रात लोकशाहीचे प्रयोग फसले आहेत. आपल्या देशात मात्रती सर्वात यशस्वी ठरली आहे, कारण आपला डीएनए लोकशाहीचाच आहे.'' यथा राजा तथा प्रजा'' नव्हे तर ''यथा प्रजा तथा राजा'' हे लोकशाहीत असते एवढे च सद्यस्थितीवरचे भाष्य उदयजी निरगुडकर यांनी केले आणि परदेशातील मुलांनी भारतातील विद्यापीठात प्रवेश मिळवण्यासाठी रांगा लावाव्यात एवढा विकसित भारत होईल अशी अपेक्षा आणि भविष्यवाणी व्यक्त केली.

शिक्षण पद्धतीमुळे कॉपी-पेस्ट, आऊट सोर्सिंग ची सवय लागली. शिक्षण म्हणजे टीचिंग आहे त्यात लर्निंग नाही. एक तरुण एक गोष्ट सर्वांना ओरडून सांगतो की मी कुत्र्याला गायला शिकवले आहे... तेव्हा लोक आश्चर्यचकित नजरेने विचारतात , तुम्हाला पाहचे असेल तर सकाळी बागेजवळ या.. मी दाखवतो कुत्र्याला गायला शिकवले आहे ते, लोक जमा होतात तेव्हा कुत्रा गात नाही, केवळ भुंकतो तेव्हा तो तरुण उत्तर देतो मी तर याला शिकवले पण तो शिकला आहे, हे मी कुठे म्हणालो.. अशीच आपली शिक्षण पद्धती आहे, त्यात टिचींग आहे लर्निंग कडे बघितले जात नाही. व्यायाम शाळेत जातो म्हणजे ट्रेनर ची ती जबाबदारी आहे आपली तब्येत सुधारून देण्याची, तसेच शाळेत जातो म्हणजे शाळेची जबाबदारी आहे शिक्षण देण्याची, पाच वर्षासाठी आपण सरकारही निवडून देतो , जबाबदारी सर्व काही करण्याची सरकारची असते, ते तसे वागले नाही तर घरी बसवले जाते, दर निवडणुकीत ५० टक्के घरी बसवले जातात ,हा लोकशाहीचा संस्कार आपल्यात आहे.



जपानी लोक मोठे देशभक्त आहेत, आपण आपत्ती येतो तेव्हा देशभक्त होत असतो इतर वेळा तेवढं नसतो, जपानी लोकांची साहस ही जीवन पद्धतीचा भाग आहे .आपण चौकटीत जगणे पसंत करतो, ते अनुशासन आतून पाळतात आपल्याकडे कोणी पाहत असेल तेव्हा अनुशासन पाळले जाते. चिकित्सक वृत्तीने विचार करून विश्वास ठेवला गेला पाहिजे .बिना खड्ग बिना ढाल स्वातंत्र्य मिळाले असे म्हटले जाते, याची चिकित्सा करून तपासले तर स्वातंत्र्याची सुरुवात १८५७ पासून चा इतिहास बघावा लागेल, संघर्ष-बलिदान तेव्हा लक्षात येईल.

पाणी टंचाईमुळे स्थलांतर करावे लागते हे वास्तव ही इथे आहे. पर्यावरण स्नेही जीवनशैली चे महत्व मोठे आहे, त्यातच आपले भविष्यही आहे याचा विचार पिढी करत आहे हेही चांगले चित्र आहे, दहा वर्षांपूर्वी कल्पनाही करू शकलो नाही ते आज सत्यात उतरले आहे. एका घरात सासरा स्कूटर घेण्यासाठी चार वर्ष वेटिंग करत होता, तेथील सून आज काही तासात चार चाकी घेऊ शकते आहे. हा प्रगतीचावेग आहे. लोकसंख्येने आपल्या एवढाच मोठ्या देशात १९ हजार विद्यापीठे आणि आपल्याकडे केवळ १८ शे विद्यापीठे आहेत. विकसित होताना, विकासाचा दर वाढताना रस्ते विकास देखील ट्रान्सपोर्ट वरील खर्च कपात होऊन उत्पादन शुल्क कमी होणे यासाठी महत्त्वाचा ठरतो. विकसित होत असताना कार्यालयातील पाण्याच्या टाकी जवळचे ग्लास साखळीने बांधणे किंवा बँकेतील काउंटर वरील पेनला दोरी बांधून ठेवावी लागावी या मानसिकतेचा विकास कामाचा नाही. मोफत काही मिळावे किंवा द्यावे ही मानसिकता नसावी.

कोरोनाच्या महा संकटात देश उभा राहिलेला आपण पाहिला, संकटाला तोंड देण्यासाठीचे टेस्टिंग किट असो किंवा लस ,औषधोपचार सर्व प्रसंगातून हे दिसून आलेले आहे. यशस्वी झालेले चंद्रयान-मंगळयान मोहिमे त महिलांची ७०% सहभाग आहे. असा चौफेर विकसित भारत होत असतानाचे स्वप्न साकार होत आहे, कोणत्याही प्रकारच्या आपापसातील मतभेद आणि परत गुलामीकडे जावे लागू नये याची काळजी घेऊ या.असेओघवते प्रेरक, महत्त्वपूर्ण व्याख्यान आज निवडणूक धामधुमीत जेष्ठ विचारवंत, संपादक उदय निरगुडकर यांनी बीडकरांसाठी देत मंत्रमुग्ध केले.

# ज्ञानेश्वरी वाघ यांना पीएचडी प्रदान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील हंडीबाग कोचिंग क्लासेच्या संचालिका ज्ञानेश्वरी पांडुरंग वाघ (हंडीबाग) यांना नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने कॉम्प्युटर सायन्स (संगणकशास्त्र)या विषयात डॉक्टरेट ही पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली आहे.

'ए नोव्हल स्कीम फॉर सेक्युर की जनरेशन थ्रू फिंगर व्हेन पॅटर्न' या विषयावर त्यांनी संशोधन केले. संशोधनासाठी त्यांना स्वा.रा.ति. विद्यापीठातील डॉ. एच.एस.फडवर,यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एन.शिंदे यांनी मार्गदर्शन केले.ज्ञानेश्वरी वाघ यांनी त्यांचा संशोधन प्रबंध विद्यापीठाला सादर केला होता.विद्यापीठात नुकत्याच झालेल्या मौखिक परीक्षेत त्यांना डॉक्टरेट ही पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी स्वामी रामानंद



तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अधिष्ठाता,प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्ञानेश्वरी वाघ (हंडीबाग) यांना प्राप्त झालेल्या पीएचडी बद्दल हरीश्चंद्र हंडीबाग,व्यंकटेश गायकवाड,विजय माने, दत्ता कलेढले,श्रीहरी साखरे,शशीकांत देशपांडे,प्रदीप धुमक, कातळे,दैवशाला हंडीबाग,पदमा धुमक आदीसह इतर नातेवाईक शिक्षण क्षेत्रातील मान्यवर यांनी अभिनंदन केले आहे.

# दक्षिण कोकणासह मराठवाडा आणि विदर्भात पावसाची शक्यता

मुंबई : राज्यात आजही काही भागात पावसाची शक्यता असून काही भागात उष्णतेची लाट पाहायला मिळेल. राज्यात अनेक भागात अवकाळी पावसानं झोडपून काढलं आहे. यामुळे शेतीसह फळबागांचंही नुकसान झालं आहे. परभणीतील पुर्णा तालुक्यासह अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस त्यामुळे काढणीला आलेल्या ज्वारीचं नुकसान झालं आहे. आज दक्षिण कोकणात पावसाची शक्यता आहे, तर त्याउलट उत्तर कोकणात उष्णतेची लाट येण्याचा अंदाज आहे.

या भागात उष्णतेच्या लाटेचा इशारा

कोकणात आज पावसाची शक्यता आहे. ठाणे आणि मुंबईत कोरडं वातावरण पाहायला मिळेल. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये आज पावसाची शक्यता आहे. दुसरीकडे, हवामान विभागाने पुणे, धुळे, जळगाव, नाशिक, अहमदनगर, सांगली, सोलापूर या जिल्ह्यांमध्येही उष्णतेचा यलो अलर्ट जारी केला आहे.

कुठे ऊन, कुठे पाऊस

आज दक्षिण कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.





३०-४० किमी प्रतितास वेगाने सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. याशिवाय, उत्तर कोकण आणि उत्तर मध्य महाराष्ट्रातील तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट परिस्थिती असण्याची शक्यता आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्रातील तुरळक ठिकाणी रात्र तापमान वाढण्याची शक्यता असून उष्ण रात्र असण्याचा अंदाज आहे.

मुंबईतील हवामान कसं असेल?

पुढील २४ तासांसाठी मुंबई शहर आणि उपनगरांसाठी हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, मुंबई शहर आणि उपनगरात आज आकाश मुख्यतः निरभ्र राहील. उष्ण आणि दमट परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३५ अंश सेल्सिअस आणि आणि किमान तापमान २७ अंश सेल्सिअसच्या आसपास असेल. दरम्यान, राज्यात सोलापूरच्या जेऊर येथे ४४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली आहे. कोल्हापूर येथे २२ अंश सेल्सिअस हे सर्वात कमी किमान तापमान नोंदवलं गेलं आहे.

कोकणात पावसाची हजेरी

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवलीत तालुक्यात अवकाळी पावसाची हजेरी लावलीय. ढगांचा गडगडाट आणि विजांचा लखलखाटासह सिंधुदुर्गात अवकाळी पाऊस सुरु आहे. अवकाळी पावसामुळे आंबा, काजू पिकांचे नुकसान होणार आहे. कणकवलीतील असरोंडी, पिसेकामते परिसरात विजेच्या कडकडाटांसह अवकाळी पावसाने हजेरी लावलीय. उष्णतेमुळे हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

आंबा आणि काजू पिकांचं नुकसान

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, रत्नागिरी जिल्ह्यातील बहुतांश भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे आंबा आणि काजू पिकावर परिणाम झाला आहे. काही ठिकाणी ढगाळ वातावरण आहे. दरम्यान पावसाच्या सरी बरसत असल्याने काही ठिकाणी गारवा जाणवला. पण, रिमझिम पाऊस थांबल्यावर मात्र उकाडा कमालीचा वाढत आहे. तळकोकणात अवकाळी पाऊस सुरु आहे.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### जागतिक वसुंधरा दिन

### महत्वाच्या घटना

१०५६ : क्रॅब नेब्यूलामधील (तेजोमेघ) सुपरनोव्हाचा महास्फोट
१५०० : पोर्तुगाल नाविक पेड्रो अल्वेयेर कैब्राल यांनी ब्राझील देशाचा शोध लावला.
१९१५ : पहिल्या विश्वयुद्धा दरम्यान जर्मन सेनांनी पहिल्याचा विषारी वायूचा वापर केला.
१९२१ : नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी प्रशासकीय सेवेतून आपल्या पदाचा राजीनामा दिला.
१९४८ : अरब-इस्त्रायल युद्ध अरबांनी इस्त्रायलचे हैफा हे प्रमुख बंदर काबीज केले.
१९७० : पृथ्वी दिन पहिल्यांदा साजरा करण्यात आला.
१९७७ : टेलिफोन वाहतूक सुरू करण्यासाठी प्रथम ऑप्टिकल फाइबरचा वापर केला गेला.
१९७९ : आचार्य विनोबा भावे यांनी संपूर्ण गोहत्या बंदीच्या मागणीसाठी उपोषण सुरु केले.
१९९७ : राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेचे संचालक डॉ. कल्याण बॅनर्जी यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील 'ओमप्रकाश भसीन पुरस्कार' जाहीर
२००६ : प्रवीण महाजन यांनी भाजपचे नेते प्रमोद महाजन यांच्यावर कौटुंबिक वादातुन गोळ्या झाडल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६९८ : वैशाख व. ७, शके १६२० शिवदिननाथ नाथपरंपरेतील एका शाखेचे प्रमुख सत्पुरुष (मृत्यू: )
१७२४ : एमॅन्युएल कांट जर्मन तत्त्ववेत्ता (मृत्यू: १२ फेब्रुवारी १८०४)
१७६० : मुघल शासक शाहाआलम यांचे द्वितीय पुत्र व भारतातील शेवटचे मुघल शासक बहादूर शहा द्वितीय यांचा जन्मदिन.
१८१२ : लॉर्ड जेम्स ॲन्ड्र्यू ब्राउन रॅमसे डलहौसी भारताचा गव्हर्नर जनरल (१८४८-१८५६), त्यांनी सार्वजनिक बांधकाम खाते स्थापन करुन सुमारे ३,४०० किमी लांबीचे रस्ते केले. टपाल व तार यांची सेवा सुरू केली. मुंबई ते ठाणे हा लोहमार्ग त्यांच्याच कारकीर्दीत सुरू झाला. (मृत्यू: १९ डिसेंबर १८६०)
१८७० : व्लादिमीर लेनिन रशियन क्रांतिकारक (मृत्यू: २१ जानेवारी १९२४)
१९०४ : जे. रॉबर्ट ओपेनहायमर अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ, अणूबॉम्बचे जनक (मृत्यू: १८ फेब्रुवारी १९६७)
१९१४ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माता बलदेव राज चोपडा यांचा जन्म. (मृत्यू: ५ नोव्हेंबर २००८)
१९१६ : यहुदी मेन्युहीन व्हायोलिनवादक व वाद्यवृंदसंचालक (मृत्यू: १२ मार्च १९९९)
१९१६ : काननदेवी अभिनेत्री व गायिका (मृत्यू: १७ जुलै १९९२)
१९२९ : प्रा. अशोक केळकर विख्यात भाषाशास्त्रज्ञ व साहित्य समीक्षक
१९२९ : उषा मराठे खेर ऊर्फ 'उषा किरण' शंभराहून अधिक चित्रपटात व रंगभूमीवर अभिनेत्री, मुंबईच्या नगरपाल (मृत्यू: ९ मार्च २००० नाशिक)
१९३५ : भारतीय-अमेरिकन गणितज्ञ आणि शैक्षणिक भामा श्रीनिवासन यांचा जन्म.
१९४५ : भारतीय प्रशासकीय अधिकारी आणि राजकारणी गोपाळकृष्ण गांधी यांचा जन्म.
१९७४ : प्रख्यात इंग्रजी कादंबरीकार व लेखक चेतन भगत यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१६ : भारतीय पंजाबी भाषेचे नाटककार, नाट्य दिग्दर्शक, कादंबरीकार आणि लघुकथा लेखक व शिक्षणतज्ञ बलवंत गार्गी यांचे निधन.
१९३३ : रोल्स-रॉयस लिमिटेड चे सहसंस्थापक हेन्री रॉयस यांचे निधन. (जन्म: २७ मार्च १८६३)
१९८० : फ्रिट्झ स्ट्रासमान जर्मन भौतिकशात्रज्ञ (जन्म: २२ फेब्रुवारी १९०२)
१९९४ : आचार्य सुशीलमुनी महाराज थोर विचारवंत, द्रष्टे समाजसुधारक आणि पुरोगामी सेवाव्रती जैन आचार्य (जन्म:)
१९९४ : रिचर्ड निक्सन अमेरिकेचे ३७ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ९ जानेवारी १९१३)
२००३ : बळवंत गार्गी पंजाबी नाटककार, दिग्दर्शक, कादंबरीकार व लघुकथाकार, पंजाब विद्यापीठातील भारतीय रंगभूमी विभागाचे प्रमुख, 'थिएटर ऑफ इंडिया' आणि 'फोक थिएटर ऑफ इंडिया' या पुस्तकांचे लेखक (जन्म: ४ डिसेंबर १९१६ भटिंडा, पंजाब)
२०१३ : लालगुडी जयरामन व्हायोलिनवादक, संगीतकार व गायक (जन्म: १७ सप्टेंबर १९३०)
२०१३ : जगदीश शरण वर्मा भारताचे २७ वे सरन्यायाधीश (जन्म: १८ जानेवारी १९३३)

# राज्यावर वाढतेय दुष्काळाचे सावट



पावसाळ्यानंतरच्या कालावधीतील शेती, उद्योग आणि पिण्याच्या पाण्याची गरज यासाठी भूजलच हा मुख्य आधार असतो. मात्र ज्या प्रमाणे जमिनीवरील पाण्याची स्थिती जाणून घेऊन त्याचे नियोजन व वाटप करणे सोपे आहे, तसे भूजलसाठ्यांबाबत करता येत नाही. केंद्र सरकारच्या भूजल विभाग आणि राज्य शासनाच्या भूजल सर्वेक्षण यंत्रणेच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील भूजलसाठ्यांचे मोजमाप केले जाते. राज्यभरातील ठराविक निरीक्षण विहिरींची सखोल माहिती आणि प्रत्यक्ष भूजल वापर या सांख्यिकीवर आधारित भूजल अहवाल प्रकाशित करण्यात येतो. २०२३ च्या भूजल अहवालानुसार, महाराष्ट्राच्या भूगर्भातील एकूण ३२ अब्ज घनमीटर भूजलापैकी सुमारे १६ अब्ज घनमीटर इतक्या भूजलसाठ्याचा वापर केला जातो आहे. २ अब्ज घनमीटर पाण्याचे बाष्पीभवन होते. तर १४ अब्ज घनमीटर भूजल वापरले जात आहे. महाराष्ट्रात जसा सर्वत्र एकसारखा पाऊस पडत नाही. तसेच सर्व ठिकाणी भूजलही एकसारखे उपलब्ध नसते.

राज्यातील ८२ टक्के शेती कोरडवाहू असून, पाण्याची मागणी सतत वाढत आहे. हवामानातील बदलांमुळे पावसाच्या प्रमाणातील अनियमितताही वाढत आहे. उपलब्ध जलसाठे वेगाने कमी पडत आहेत. राज्यापुढे गंभीर जल संकट निर्माण होत आहे. नवे भूपृष्ठजल साठे निर्माण करण्यावरही मर्यादा आहेत. म्हणूनच गेल्या वीस वर्षापासून भूगर्भस्थिती अनुकूल ठेवून भूजल पुनर्भरण आणि भूजल संधारणात वाढ करण्यासाठी निरनिराळे प्रयत्न सुरू आहेत. त्यात किती यश येईल माहित नाही.

दुष्काळाचे सावट

जागतिक हवामान बदलाचा परिणाम म्हणून राज्याला वारंवार दुष्काळ आणि पूरस्थिती अशा परस्परविरोधी घटनास्थितीस तोंड द्यावे लागत आहे. महाराष्ट्रात गेल्या ५० वर्षांत दुष्काळी घटनांमध्ये तब्बल सात पटीने, तर पुराच्या घटनांमध्येही सहा पटीने वाढ झाली आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतील मागील पाच दशकांचा पर्जन्य आढावा घेतल्यास १९७०-७९ मध्ये ११, १९८०-८९ मध्ये १४, १९९०-९९ दरम्यान १७, २०००-२०१० दरम्यान २३ आणि २०१०-२०२० दरम्यान ७९ दुष्काळाच्या घटना घडल्याचे लक्षात येते. अर्थात, दुष्काळी घटनांतील ही वाढ मागील पाच दशकांत सात पटीने वाढली आहे. दरवर्षी महाराष्ट्रातील ८० टक्क्यांपेक्षा जास्त जिल्ह्यांमधील ७८ दशलक्ष कुटुंब दुष्काळाच्या किंवा दुष्काळसदृश परिस्थितीच्या छायेत वावरत आहेत.

दिवसेंदिवस महाराष्ट्र राज्यावरील दुष्काळाचे सावट गडदच होत चाललेले आहे. राज्य शासनाने सुरुवातीला १५ जिल्ह्यांतील २४ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले होते. आता ही यादी १६ जिल्ह्यांतील ४३ तालुक्यांपर्यंत पोहोचली आहे. याच वेगाने प्रवास सुरू राहिला तर ही संख्या २६ जिल्ह्यांतील १५१ तालुके इतकी मोठी होण्याचीही भीती आहे. दुष्काळावर मात करण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारच्या वतीने अनेक उपाययोजना राबवल्या जात आहेत. त्यात एकात्मिक जलस्रोत विकास आणि व्यवस्थापन; जल जीवन मिशन अंतर्गत वितरण प्रणालीत अपव्यय कमी करणे; अटल भूजल योजनेतून जल आराखडा निर्मिती आणि अंमलबजावणी; जलयुक्त शिवार व अमृत प्रकल्पाद्वारे जलसाठ्यातील वाढ; राष्ट्रीय जल अभियान, जलशक्ती अभियान इ. माध्यमांतून जलसंधारण आणि पावसाच्या पाण्याची साठवणूक; पारंपरिक जलसंधारण; बोअरवेल, भूजल पुनर्भरण; पाणलोट विकास आणि सघन वनीकरण यावर लक्ष केंद्रित केले जात आहे.

समन्यायी वाटपाकडे जाताना : दुष्काळाचा पहिला सामना कोरडवाहू क्षेत्रातील शेतकऱ्यांना सर्वात आधी करावा लागतो. त्यांना दुष्काळामुळे शेतीत कमी उत्पन्न आणि बेरोजगारीमुळे शहराकडे स्थलांतर असे मोजकेच पर्याय शिल्लक राहतात. त्यांची शेती टिकली पाहिजे, ती अधिक उत्पन्नक्षम झाली पाहिजे, यासाठी आपल्या सर्वांचे वर्तन प्रगल्भ करण्याची गरज आहे. त्यासाठी राज्यातील उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासंदर्भात प्रयत्न वाढवावे लागतील. आज देशातील ४० टक्के धरणे महाराष्ट्रात आहेत. राज्यातील धरणे आणि बंधारे यांची पाणी साठवण क्षमता ६९ हजार दशलक्ष घनमीटर एवढी प्रचंड असूनही पाणी वितरण व वापराची स्थिती समन्यायी पद्धतीची आहे असे म्हणता येत नाही. १९६० मध्ये राज्यात उसाखाली असलेले क्षेत्र १.५ लाख हेक्टर वरून १२ लाख हेक्टरवर पोहोचले झाले आहे. हे उसाचे पीक राज्यातील सिंचनासाठी उपलब्ध पाण्यापैकी सुमारे ७५ टक्के पाणी वापरत आहे. उसाला तितकेच फायदेशीर असे पर्यायी पीक देण्यात आपले कृषी शास्त्रज्ञ आणि एकूणच अर्थव्यवस्था कमी पडते आहे. दुष्काळमुक्तीसाठी महत्त्वाचे मुद्दे पूर्वी आपण हातात टिकाव-फावडे घेऊन सीसीटी करत ४५ दिवसांत दुष्काळमुक्तीचे स्वप्न पाहत होतो. पण आता तेवढे कष्ट कशाला उचलायचे म्हणत मोठमोठ्या खोदयंत्राद्वारे नदीनाल्यांच्या पात्राची उकराउकर करण्यात धन्यता मानत आहोत. त्याचे तत्कालीन काही फायदे झाले तरी दीर्घकालीन तोटेच होण्याची शक्यता लक्षात कोण घेणार?


पिंगोरीने साधली कायमची दुष्काळमुक्ती

दुष्काळमुक्तीसाठी अनिवार्यपणे जल आराखडा निर्मिती, अंमलबजावणीचे दीर्घकालीन धोरण आवश्यक. तात्पुरत्या आणि तुटक स्वरूपाच्या जल संरचनांनी दुष्काळमुक्ती अशक्य वाटते. जल संरचना राबविण्यापूर्वी त्यातून बाष्पीभवन किती, नेमके पाणी मुरले किती यासारख्या नोंदी असायला हव्यात. जलसंधारण कामांचे तांत्रिक मुल्यांकनच व्यवस्थित करावे लागेल. पाणलोटात शेततळी संख्या वाढत आहे. ही शेततळी पावसाच्या पाण्याने भरण्याऐवजी पावसाळा संपल्यानंतर भूजलाचा अंदाधुंद उपसा करत भरली जात आहेत. त्याने एका बाजूला भूजल पातळी आणखी खालावत जाणार आहे, तर दुसऱ्या बाजूला पाणी वाढत्या तापमान बाष्पीभवनाद्वारे वाया जाणार आहे. त्यामुळे शेततळी हे संरक्षित सिंचनासाठीच असून, ती पावसाच्या पाण्यावरच भरली गेली पाहिजेत, याकडे धोरण आखण्याची गरज आहे. सध्या यावर कोणाचे कसलेही नियंत्रण दिसत नाही. पाणी वापराच्या कार्यक्षम पद्धती वापरावर भर हवा. गावच्या पाण्याचा ताळेबंद मांडूनच समन्वयाने समन्यायी पाणी वापर केला पाहिजे. त्रिस्तरीय पुनर्भरण, भैरव कुंड, निसर्ग बेट अशा सहज स्वयंस्फूर्तीने करण्यायोग्य आणि आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या जल संरचनांचा प्रचार आणि प्रसार वेगाने केला पाहिजे.

# मका पिकावरील कीड-रोग ओळख व एकात्मिक व्यवस्थापन

गहू व भात पिकानंतर मका हे जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकावरील तृणधान्य पिक आहे. मका हे पिक उष्ण, समशीतोष्ण व शित अशा हवामानाशी समरस होणारे पीक असून २५ ते ३०० तापमानात वर्षभर घेता येणारे पीक आहे. देशाचा विचार केला असता भारतात मका पिकाखाली एकूण ९८.६५ लाख हे क्षेत्र असून ३१५.१० लाख टन उत्पादन व एकुण ३२०० किलो प्रति हेक्टर उत्पादकता आहे. महाराष्ट्र राज्यात मका हे पीक प्रामुख्याने नाशिक, धुळे, कोल्हापुर, औरंगाबाद, उस्मानाबाद, जालना, बुलढाणा, नंदुरबार आणि सोलापूर या जिल्हयात मोठ्या प्रमाणात घेतले जाते. मक्याचा वापर मुख्यत्वे अन्नधान्य, पशुखादय, पोल्ट्रीखादय तसेच इतर मुल्यवर्धित खादयपदार्थासाठी होतो. मका पिकामध्ये कार्बोदके तयार करण्याची जास्त क्षमता असल्याने इतर तृणधान्यांपेक्षा उत्पादन क्षमता जास्त आहे. सदर पिकामध्ये ६०.६८ टक्के स्टार्च, ७.१५ टक्के प्रथिने, ४.५ टक्के स्निग्ध पदार्थ, ६ टक्के साखर व २.५ टक्के क्रुड फायबर असून इतरही उपयोगामुळे महाराष्ट्र राज्यात मका पिकाखालील क्षेत्र दिवसेंदिवस वाढतच आहे. महाराष्ट्र राज्यात मक्याखाली एकुन १२.०२ लाख हे क्षेत्र असून ३५.८८ लाख टन उत्पादन व २९८३ किलो प्रति हेक्टर उत्पादकता आहे. मका पिकाच्या बहुगुणी उपयोगामुळे या पिकाला तृणधान्यांची राणी आणि चारा पिकांचा राजा असे संबोधले जाते.

मका पिकाचे ३० ते ४० टक्के उत्पादन कमी होण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे पिकावर येणारे निरनिराळे कीड आणि रोग होय. पिकास उगवणीपासून काढणीपर्यंत प्रादुर्भाव करणाऱ्या निरनिराळ्या किडी म्हणजे अमेरिकन लष्करी अळी, खोडकिड, कणसे पोखरणारी अळी, गुलाबी अळी, पाने गुंडाळणारी अळी, केसाळ अळी, करडे सोंडे आणि मावा होय. मका पिकावरील महत्वाच्या रोगांचा विचार केला तर टर्सिकम व मेडिस करपा, फुलोऱ्या पूर्वीचा खोड कुजव्या व तांबेरा असे विविध रोग आढळुन येतात. मक्यावर येणाऱ्या विविध किडींपैकी अमेरिकन लष्करी अळी ही एक महत्वाची किड असून सदर किडीमुळे मका



पिकाचे ५ ते ९० टक्क्यांपर्यंत नुकसान होवू शकते म्हणून या किडीचे वेळीच एकात्मिक व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

किडीच्या नुकसानीचा प्रकार : या नुकसानीचा प्रकार म्हणजे सर्वप्रथम अंडयातुन बाहेर आलेल्या अळया पानांचा पापुद्रा खातात. त्यामुळे पानांना पांढरे चट्टे पडतात. दुसऱ्या ते तिसऱ्या अवस्थेतील अळया पानांना छिद्रे करतात. कालांतराने या अळया पोंग्यात जावून छिद्रे करतात. जुनी पाने पर्णहीन होवून पानांच्या शिरा व झाडाचे मुख्य खोड शिल्लक राहते. झाड फाटल्यासारखे दिसते. पोंगा धरण्याची सुरुवातीची अवस्था प्रादुर्भावास कमी बळी पडते. मध्यम पोंगे अवस्था कमी तर उशीरा पोंगे अवस्था अळीला जास्त बळी पडते. कालांतराने अळी कणसाच्या बाजुने आवरणाला छिद्र करुन दाणे खाते.

खोडकीड : या किडीचे वैशिष्ट म्हणजे अळीच्या पाठीवर काळया ठिपक्यांचे पट्टे असून डोके गडद रंगाचे असते. नावाप्रमाणे या किडीचा नुकसानीचा प्रकार म्हणजे खोडाला आतुन पोखरने. किडीची अळीअवस्था नुकसानकारक आहे. पुर्ण वाढ झालेली अळी २.२ सें.मी. लांब धुरकट करडया रंगाची असून डोके काळे असते. मादी पतंग पानांच्या खालच्या बाजुला २ ते ३ रांगेत चपटया आकाराची ३०० अंडी देते. अंडी ५० ते १०० च्या समुहात असतात. अळी अवस्था १४ ते २८ दिवसांची असून त्यात ५ ते ६ वेळा कात टाकते. पुर्ण वाढ झालेली अळी खोडाला छिद्र पाडुन आत कोषात जाते. कोषातुन आठवड्याने प्रौढ बाहेर पडतो. अळी पानांना समान रेषेत छिद्र करुन खोडाच्या आतील भाग पोखरते. त्यामुळे पोंगा पुर्ण वाळतो. पिकाची रोपावस्था किडीला बळी पडणारी आहे. मका पिकाची उगवण झाल्यावर जवळपास चौथ्या आठवडयानंतर किडीचा प्रादुर्भाव सुरु होतो. सदर अळीची आर्थिक नुकसान पातळी म्हणजे १० टक्के झाडांच्या पानांवर गोल छिद्र किंवा ५ टक्के पोंगेमर आढळणे होय.

खोडमाशी : ही कीड घरमाशीसारखी पण आकाराने लहान असते. तिची लांबी ५ मि.मी असून रंग गडद असतो. अळी अवस्था फिक्कट पिवळया रंगाची असते. मादी माशी १५ ते २५ अंडी कोवळया पानांखाली किंवा खोडाच्या तळाशी घालते. अंडी उबवून अळी अवस्था ७ ते १० दिवसाची असते. पूर्ण वाढ झालेली अळी खोडात किंवा जमिनीत कोषावस्थेत जाते. कोषावस्था एक आठवडयाची असून कोषातून बाहेर पडलेली माशी ३-६ दिवस जगते. या किडीचा एकुण जीवनक्रम २१ ते २७ दिवसात पुर्ण होतो. मका पिकाची उगवण झाल्यानंतर चौथ्या आठवडयापर्यंत या किडीचा होतो. सुरुवातीला अळी पिकाची कोवळी पालवी खाते व हळूहळू पोंग्यात शिरुन पोंगेमर होते व त्याचा दुर्गंध येतो. प्रादुर्भावग्रस्त रोपांना बुंध्यापासुन नवीन फुट येते व किडीला बळी पडते. जुन्या झाडांमध्ये पाने खोडमाशीमुळे वेडीवाकडी होतात. सदर किडीची आर्थिक नुकसान पातळी म्हणजे १०% पोंगेमर होय. सदर किडीच्या व्यवस्थापनासाठी बियाण्याचे प्रमाण वाढवून प्रादुर्भावग्रस्त रोपे वेळीच उपटुन नष्ट करावीत. पेरणीपुर्वी थायमिथॉक्झाम १० ग्रॅम किंवा इमिडाक्लोपराईड १० ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. आर्थिक नुकसान पातळी गाठताच डायमिथोएट २० मिली. १० लि. पाण्यातून फवारणी करावी. पीक काढणीनंतर शेतातील अवशेष जाळून नष्ट करुन खोल नांगरट करावी. जेणेकरुन किडीची सुप्तावस्था नष्ट होईल, पिकाच्या उगवणीपासुन ५० दिवसांपर्यंत फिशमिल सापळे प्रति हेक्टरी १-२ प्रमाणात लावावेत. फिशमिल सापळ्यात मासळीच्या वासासारख्या रसायनाचा वापर केला जातो. या रसायनाकडे खोडमाशी आकर्षित होवून सापळयात अडकुन मरते.

कणसे पोखरणारी अळी : या किडीस बळी पडणारी पिकाची अवस्था म्हणजे केसर अवस्था होय. या किडीचे पतंग मध्यम आकाराचे मळकट पिवळे करडया रंगाचे असतात. या किडीची अळी हिरव्या असून ३८ ते ५० मी.मी. लांब असते. अळया कणसातील दाण्यांवर उपजीविका साधतात. त्यामुळे उत्पादनावर परिणाम होतो. एक मादी सुमारे ३५० अंडी घालून अळीची पुर्ण वाढ कणसामध्ये १५ ते ३५ होते. मादीपतंग बहुदा कणसाच्या स्त्रिकेसरवर अंडी घालतात. अळया जमिनीत कोषावस्थेत जातात. कोषावस्था हवामानानुसार १० ते २५ दिवसांची असते. सदर अळीच्या नियंत्रणासाठी सुरुवातीला लहान अळया उचलुन नष्ट कराव्या. पिकांचे आणि इतर पर्यायी कीड वाढणाऱ्या झाडांचे अवशेष नष्ट करावेत. तसेच सुप्तावस्थेत अळी असलेले खोड छाटावे. जैविक किड व्यवस्थापनामध्ये ट्रायकोग्रामा चीलोनिस या परोपजीवी किडीची अंडी असलेले ८ कार्ड प्रति हेक्टरी लावावेत. एच.ए.एन.पी.व्ही. २५० एल.ई. प्रती हेक्टरी वापरावे. सुरवातीला निंबोळी अर्क ५ % उगवणीनंतर १५ दिवसांनी फवारणी करावी. किडीने आर्थिक नुकसान पातळी गाठल्यास रासायनिक किटकनाशकाची फवारणी घ्यावी. ५ मिली स्पिनेटोरम ११.७% एस.सी. प्रति १० लिटर पाण्यातून १५ दिवसांच्या अतराने दोन फवारण्या घ्याव्यात. प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्यास इमामेक्टीन बेन्झोएट ५ एस.जी. ५ ग्रॅम किंवा क्लोरॅन्ट्रनिलिप्रोल १८. ५० एस.सी. ४ मिली प्रति १० लि. पाण्यात फवारावे.

# अचूक तंत्राद्वारे लवकर आंबा उत्पादन शक्य

आंब्याची योग्य अंतरावर लागवड करून वळण व छाटणी तंत्राचा अचूक वापर करीत तिसऱ्या किंवा चौथ्या वर्षांपासून चांगले उत्पादन घेणे सहज शक्य असल्याचा दावा, केव्हीकेचे उद्यानविद्या तज्ज्ञ निवृत्ती पाटील यांनी केला.

वाशीम कृषी विज्ञान केंद्रांतर्गत उद्यानविद्या विभागाच्या वतीने वाशीम जिल्ह्यात संत्रा या फळपिकासोबत आंबा या पिकाचे क्षेत्र व उत्पादन वाढीच्या दृष्टीने मागील दोन वर्षांपासून प्रयत्न व प्रोत्साहन देण्यात येत आहे.

आंबा विक्रीसाठी प्रतवारी ठरते महत्त्वाची : मागील हंगामात ९ शेतकऱ्यांनी गटाच्या माध्यमातून अतिघन पद्धतीने आंबा लागवड केली. या वर्षी बरेच नवीन शेतकरी या पद्धतीने आंबा लागवड करण्यास इच्छुक आहेत. या उद्देशाने केव्हीकेच्या पुढाकाराने अतिघन आंबा लागवड तंत्रज्ञान या विषयावर ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण घेण्यात आले.

# भगरे गुरुजींची भागवत कथा म्हणजे अध्यात्माचा प्रसाद -जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

अध्यात्मिक परंपरा असलेल्या नवगणराजुरी गावांमध्ये भागवताचार्य अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांनी गेल्या सहा दिवसापासून आपल्या सुश्राव्य वाणीतून भागवत कथेचे महत्व आणि महात्म्य भाविकांना सांगितले. कथेच्या माध्यमातून एक प्रकारचा अध्यात्माचा प्रसादच दिला असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.



नवगण राजुरी येथे स्व.सुरेखाताई रविंद्र क्षीरसागर यांच्या द्वितीय पुण्यस्मरणार्थ हेमंत रविंद्र क्षीरसागर यांनी आयोजित केलेल्या श्रीमद्? भागवत कथेच्या समारोप प्रसंगी, कथाकार वे.शा.सं. भागवताचार्य अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांनी गेल्या सहा दिवसात आपल्या अमूल्य वाणीतून भागवताचे महात्म्य आणि महत्व पटवून दिले आहे. पुण्यात्माच्या पुण्यस्मरणानिमित्त ही कथा ऐकण्याचा योग आला. अध्यात्माची परंपरा असलेले नवगण राजुरी गाव असून इवलेसे रोप लावियेले द्वारी त्याचा वेलू गेला गगनावरी, यानुसार राजुरीचेही महत्व आता वाढले आहे. स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी प्रत्यक्ष परमेश्वर देखील आईविना भिकारी होता. आपण मात्र आईच्या सानिध्यात, संस्कारात वाढलो आहोत हे आपले भाग्य आहे. वसा आणि वारसा चालवत असताना समाजाला बरोबर घेऊन आपल्या परिवाराने काम केले आहे. भागवत कथेतून अतुलशास्त्री यांनी विविध प्रसंग उभे केले असून आयुष्य जगण्यासाठीची शिदोरी हवी ती या ठिकाणी दिली आहे. परमेश्वर सेवेपेक्षा आई-वडिलांची सेवा सर्वात महत्त्वाची असते त्यानुसार हेमंत ने ही कथा आयोजित करून राजुरी सारख्या अध्यात्मिक परिसरात भाविकांना अध्यात्माचा प्रसादच दिला आहे. कुटुंबाच्या नात्यांची गुंफण विस्कटणार नाही याची सर्वांनी काळजी घ्यायला हवी, धनसंपत्तीपेक्षा कर्तव्य महत्त्वाचे असते हेच या कथेतून बोध घेण्यासारखे आहे. भगरे गुरुजींनी या कथेतून हा अध्यात्माचा प्रसादच दिला असल्याचे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी म्हटले आहे. कथेनंतर यजमान हेमंत क्षीरसागर व सौ.प्रिया हेमंत क्षीरसागरसह माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, सौ. प्रतिभाताई क्षीरसागर यांनी महाआरती देखील केली, यावेळी राजुरीचे सुपुत्र महंत अमृत आश्रम स्वामी महाराज यांना शासनाकडून पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कारही करण्यात आला.

आजच्या कथेच्या सुरुवातीला वे.शा.सं. भागवताचार्य भगरे गुरुजी म्हणाले की, आईच्या द्वितीय पुण्यतिथीचा कार्यक्रम कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता हेमंत क्षीरसागर यांनी सर्वांना बरोबर घेऊन सर्वांना आपलं कुटुंब म्हणून उत्तम आयोजन करत भागवत कथा भव्य दिव्य केली आहे. जिवंत असेपर्यंत आपल्यामुळे दुसर्याच्या डोळ्यात अश्रू येऊ देऊ नका माता-पित्यांच्या सेवेत जे फळ प्राप्त होते ते इतर कुठल्याही सेवेत मिळत नाही असे सांगून त्यांनी मातापित्यांची सेवा करण्याचे आव्हान केले. यावेळी हेमंत क्षीरसागर, महंत अमृत महाराज यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी रंग माझा वेगळा या मालिकेतील अभिनेत्री व भगरे गुरुजी यांची कन्या अनघा भगरे, ह.भ.प. नारायण महाराज डिसले, रविंद्र क्षीरसागर, डॉ विठ्ठल क्षीरसागर, विजूताई महिंद्रे, रोहित क्षीरसागर, जगदीश काळे, दिनकर कदम, सुभाष क्षीरसागर, विलास विधाते, नानासाहेब काकडे, सुधाकर मिसाळ, डॉ.राजा मचाले, एम.ए. राऊत, सखाराम मस्के, प्रा.किशोर काळे, जीवन जोगदंड, दिलीप खांडे, आसाराम गायकवाड, प्रकाश उपरे, राजेंद बहीर, रामचंद्र बहीर, मुळूक गुरूजीख, समाधान गुरूजी, सागर गुरूजी, कृष्णा महाराज, विनायक गुरूजी यांच्यासह नवगण राजुरी परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी रिपाइंचा ईद ए-मिलाफ उत्साहात



बीड । प्रतिनिधी

हिंदू-मुस्लिमांच्या ऐक्याचे प्रतिक असलेल्या पवित्र रमजान ईदचे औचित्य साधून हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हिंदू-मुस्लिम समाज बांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी व सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी बीड शहर रिपाइंच्या वतीने बशीरगंज चौक बीड येथे शनिवार (दि.२०) रोजी हजारो हिंदू-मुस्लिम बांधवांच्या उपस्थितीत ईद ए-मिलाफ कार्यक्रम संपन्न झाला.

भारताची एकात्मता व देशातील सर्व धर्मीय भाईचारा व बंधुता टिकून ठेवण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य व बंधुताचा संदेश देत भारत एक संघ ठेवण्याचे महान कार्य केले. सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी व हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी गेल्या बारा वर्षापासून रिपाइंच्या वतीने केले जात आहे. आगामी काळातही समता, स्वातंत्र्य,बंधुता व एकोपा जोपासण्यासाठी सर्व धर्मीयांना सोबत घेऊन ईद ए-मिलाफच्या माध्यमातून सुरू राहणार आहे. रिपाइंच्या वतीने रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी आयोजित केलेल्या ईद-ए-मिलाफच्या कार्यक्रमास माजी मंत्री सुरेश नवले, माजी आ. राजेंद्र जगताप, विजयसिंह पंडित, शिराज देशमुख, सय्यद सलीम, ज्योतीताई मेटे, अनिल जगताप, जहीर कादरी, मोईन मास्तर, विलास महाराज शिंदे, शेख तय्यबभाई, सचिन मुळूक, फारूक पटेल, शफिक भाऊ, नवनाथ शिराळे, चंदू नवले, शेख निजाम,सिकंदर टेलर, कामरान शेख, अक्रम बागवान, विष्णू वाघमारे, सुहास पाटील, अविनाश नाईकवाडे, सचिन कागदे, प्रेम गुरखुदे, सचिन उबाळे, अश्फाक इनामदार, अशोक साळवे, किशोर कांडेकर,अविनाश जावळे, दीपक कांबळे, अरुण भालेराव, नरेंद्र जावळे, गोवर्धन वाघमारे, बापू पवार, यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजू जोगदंड, मझरखान, सिद्धीकी फारोकी, किसन तांगडे, सय्यद जफर, रफिक भाई फिटर, रमेश गंगाधरे, सुलतान बाबा, वसीम बागवान, नामदेव वाघमारे, रणजीत शिंगारे, मुखीद बागवान, अख्तर फारोखी, विलास जोगदंड, भैय्या मस्के, बाळासाहेब जोगदंड, सोनू वडमारे, मिरान फारोखी, रफिक मिस्त्री यांनी परिश्रम घेतले.

## शारीरिक सुदृढतेसह मानसिक सक्षम असणे गरजेचे- डॉ. सुवर्णा बेद्रे

बीड । प्रतिनिधी

केवळ शारीरिक सुदृढता असून चालत नाही तर मानसिकदृष्ट्या सक्षम असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी सांस्कृतिक क्षेत्राशिवाय दुसरा पर्याय नाही असे प्रतिपादन शासकीय परिचारिका महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुवर्णा बेद्रे-कुलथे यांनी केले. परिवर्तन प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित ५५ व्या बालनाट्य शिबिराच्या समारोप प्रसंगी त्या बोलत होत्या. या प्रसंगी डॉ. सुवर्णा बेद्रे यांनी नर्सिंग क्षेत्रामध्ये पीएच.डी. केल्याबद्दल आणि एम.बी.ए केल्याबद्दल परिवर्तन प्रतिष्ठानच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ अभिनेत्री डॉ. उज्वला वनवे या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या आरंभी डॉ. बेद्रे आणि डॉ. वनवे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून नटराज पूजन करण्यात आलं. ज्येष्ठ नाट्य प्रशिक्षक डॉ. सतीश साळुंके यांनी उपस्थित पाहुण्यांचे शाल आणि सन्मानचिन्ह देऊन स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

डॉ. बेद्रे आपल्या भाषणात पुढे म्हणाल्या की, कोरोनाच्या काळानंतर समाजामध्ये वैफल्यग्रस्तता आणि निर्विकारकतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणामध्ये वाढले. त्यामुळे कुटुंबात कलह निर्माण होण्याचे प्रमाण वाढले. त्याचा परिणाम कुटुंबातील मुलांवर होतोय. अशा वेळी नाट्यक्षेत्रात रचनात्मक काम करणाऱ्या परिवर्तन सारख्या संस्थानचे समाजामध्ये मोठे महत्त्व आहे. त्यामुळे मुलांना व्यक्त होण्याची संधी मिळते. ज्येष्ठ अभिनेत्री डॉ. उज्वला वनवे यांनी आपल्या भाषणात म्हटले की, आपण कितीही प्रगती केली, कितीही उंच उडालो तरी आपली भक्ती मात्र ही आपल्या घराच्या उंबरठ्यावर असायला पाहिजे. ज्ञान हे नम्रतेने घ्यायला पाहिजे त्यात गर्विष्ठपणा असता कामा नये. परिवर्तन ही गेल्या ३५ वर्षांपासून नाट्य क्षेत्रात मूलभूत काम करणारी संस्था असून महाराष्ट्रात तिचा धबधबा आहे. नाटकाचे शंभर टक्के प्रशिक्षण देणारी ही संस्था आहे. मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी नाटक हा अत्यंत महत्त्वाचा घटक असून ज्या पालकांनी परिवर्तनच्या प्रशिक्षण शिबिरासाठी मुलांना पाठवलं त्यांचेही अभिनंदन वनवे यांनी केले. यावेळी शिबिरात सहभागी असलेल्या बालकलावंतांना डॉ. वनवे आणि डॉ. बेद्रे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. शिबिरार्थ्यांच्या वतीने कु. अवनी तांदळे व विपुल मस्के यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली.

शिबिरामुळे आपल्या वर्तनात मोठा बदल झाला असून आत्मविश्वास निर्माण झाल्याचं ते म्हणाले. कार्यक्रमाची सूत्रसंचालन अण्णासाहेब गडदे यांनी केले.

## माजलगावमध्ये माकपचा कार्यकर्ता मेळावा

माजलगाव । प्रतिनिधी

भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) चा माजलगाव विधानसभा मतदारसंघ पातळीवरील कार्यकर्ता मेळावा शुक्रवारी दिनांक १९ एप्रिल २०२४ रोजी शहरामध्ये संपन्न झाला. या मेळाव्यासाठी माकपचे माजलगाव, वडवणी आणि धारूर या तालुक्यातील प्रमुख पक्ष कार्यकर्ते उपस्थित होते. या मेळाव्याचे उद्घाटन माकपचे माजलगाव तालुका सचिव कॉम्रेड मुसद्दिक बाबा सर यांनी केले. मेळाव्याला प्रमुख मार्गदर्शक म्हणून माकप नेते डॉ. महारुद्र डाके, माकप जिल्हा सचिव अजय बुरांडे, याकूब सय्यद यांची प्रमुख उपस्थिती होती.



मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना बाबा सर म्हणाले की, 'माकप हा जनतेच्या प्रश्नावर लढणारा पक्ष आहे. या जनलढ्यामधूनच तो आपली ताकद निर्माण करत असतो. म्हणून पक्षाचा विस्तार आणि पक्षाचे संघटन मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी झोकून देण्याची गरज आहे'. डॉ. महारुद्र डाके यांनी माकपचा पक्ष कार्यक्रम कार्यकर्त्यांसमोर मांडला. त्यांनी माकपची विचारपद्धती कार्यकर्त्यांसमोर मांडली. जिल्हा सचिव अजय बुरांडे यांनी पक्षाची कार्यपद्धती बद्दल मार्गदर्शन केले. मेळाव्याला माकप नेते सय्यद याकूब यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले की, सध्याच्या परिस्थितीत केंद्रामध्ये सत्तेत असलेले भाजपचे सरकार विरोधकांवर गंभीर हल्ले करत आहे. दोन मुख्यमंत्र्यांना त्यांनी जेलमध्ये टाकले. इलेक्टोरल बॉण्डच्याद्वारे ६ हजार कोटीचा पैसा भाजपने खाल्ला आहे. परंतु इतर पक्षातले भ्रष्ट नेते भाजपमध्ये गेल्यानंतर त्यांना क्लीन चीट दिली जाते. हे राजकारण आपण सर्वांनी समजून घेतले पाहिजे. भाजपने या देशातील संविधानाला आणि लोकशाहीला धुळीस मिळवले आहे. म्हणून आजची खरी लढाई लोकशाही वाचवण्याची आहे. त्यासाठी माकप हा पुरोगामी आणि धर्मनिरपेक्ष विचाराच्या बाजूने कायम उभा आहे. धर्मांध व जातीयवादी भाजपच्या उमेदवाराचा दारुण पराभव करण्यासाठी माकप संपूर्ण ताकद लावेल. आपल्या पक्ष कार्यकर्त्यांनी आपापल्या परिसरात भाजपच्या विरोधात जोरदार प्रचार केला पाहिजे. माकप हा महाविकास आघाडी सोबत असून बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार या मेळाव्याने केला. कारण भाजपाची तानाशाही, हुकुमशाही प्रचंड मुजोरी पद्धतीने वाढत चालली आहे. आणि याला आवर घातलाच पाहिजे. त्यासाठी माकप कार्यकर्ते जबरदस्त पद्धतीने संपूर्ण परिसरात काम करणार आहेत.

या कार्यकर्ता मेळाव्यात माकपचे दत्ता डाके, डॉ. अशोक थोरात, रोहिदास जाधव, काशीराम सिरसट, बळीराम भुंबे, संदिपान तेलगड, सुहास झोडगे, मीराताई शिंदे, मनीषाताई करपे यांची प्रमुख उपस्थिती होती. मेळाव्याचे प्रास्ताविक रोहिदास जाधव यांनी केले तर सूत्रसंचालन सुरात झोडगे यांनी केले. डॉ. अशोक थोरात यांनी आभार मानले. माकपचा कार्यकर्ता मेळावा यशस्वी करण्यासाठी फारुक सय्यद, अशोक राठोड, विनायक चव्हाण, कृष्णा सोळंके, सुभाष डाके, अशोक डाके, एकनाथ सक्राते, पवन चिंचाणे, आनंद सक्राते, समीर शेख, नसीर कुरेशी, महेबूब शेख, रफिक सय्यद आदींनी परिश्रम घेतले.

## राष्ट्राच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रित येऊन कार्य करणे काळाची गरज-डॉ.निरगुडकर

शिरूर । प्रतिनिधी

आज लहानांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वच जण फोर आणि फाईव्ह जीच्या जमान्यात दिवसभर व्यस्त दिसत असून आपण नेमके कुणीकडे चाललोय याचे जराही भान राहिले नसून लाईक आणि कमेंट करण्यात धन्यता मानत दिवस घालवत आहोत.हे कुठेतरी थांबवून राष्ट्राच्या प्रगतीसाठी सर्वांनी मतभेद विसरून एकत्रित येऊन सर्वच क्षेत्रात कार्य करणे काळाची गरज असल्याची मत ज्येष्ठ विचारवंत डॉ.उदय निरगुडकर यांनी केले.ते तालुक्यात खालापुरी येथे विकसित ग्राम ते विकसित भारत या ग्रामसंवाद कार्यक्रमात बोलत होते.

शिरूर तालुका आदर्श पत्रकार संघ व ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक तथा एकता फाऊंडेशनचे अध्यक्ष अनंत कराड हे तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत डॉ. उदय निरगुडकर हे होते.या वेळी व्यासपीठावर संपादक जगन्नाथ परजने, पत्रकार सतीश मुरकुटे पत्रकार अंगद पानसंबळ,युवराज बर्डे, शिवाजी वाघमारे यांची उपस्थिती होती.पुढे बोलताना निरगुडकर म्हणाले की पूर्वी बोललं जायचं तिसरं महायुद्ध हे पाण्यासाठी होईल ते आता खरं वाटु लागल असून आज राज्यात तर आहेच परंतु देशात तसेच जगातही भयानक पाणी प्रश्न निर्माण झाला आहे.

त्यामुळे आपल्याला आता त्याला प्रखरपणे समोर जावेच लागणार आहे.त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन मतभेद विसरून काम करावे लागणार आहे.सर्वांनी प्रेरित होऊन काम केले तर त्यावर मात करु व प्रगतशील राष्ट्र बनवु. नकारात्मक,व्यस्त,सुस्त माणसांपासून सावध राहून आपल्याला आता काम पुढे न्यावे लागणार आहे.संकट तर इतर देशांनाही आली होती त्यांनी धैर्याने सामना करून त्यावर मात केली असेच काम आता आपणाला दुष्काळावर मात करून एकत्र येऊन काम करावे लागणार आहे.एकत्र येऊन काम केले तर इतिहास घडत असतो.त्यामुळे शिरपूर सारखे पॅटर्न गावागावात राबविणे गरजेचे असल्याचे मतही त्यांनी व्यक्त करून जलस्रोत वाढवण्यासाठी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर काम करणे गरजेचे असल्याचे सांगितले. यावेळी मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती.

## गुरुकृपा इन्स्टिट्यु ट मधील प्राध्यापकांच्या संशोधनाला भारत सरकारचे पेटंट

माजलगाव । प्रतिनिधी

रक्तातील कोलस्टेरॉल पातळी मोजण्याच्या यंत्रा मध्ये सुधारणा करत माजलगाव तालुक्यातील गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी येथील तरुण संशोधक प्राध्यापक निखिल निळकंठ जाधव आणि प्रा. ऋषिकेश शिवाजीराव शेंडगे यांनी एक नवीन प्रकारचे डिवाईस डिझाईन केले आहे जे अत्यंत सोप्या पद्धतीने हाताळता येईल व रक्तातील कोलस्टेरॉलची पातळी शोधण्याचे काम करेल. या संशोधनासाठी त्यांनी दि. ०९/०२/२०२४ रोजी भारत सरकारच्या आय पी आय संस्थेच्या वेबसाईटवर नोंदणी अर्ज केला होता.



फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडियाशी संलग्नित असणाऱ्या गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी येथील प्रा. जाधव आणि प्रा. शेंडगे यांनी औषधनिर्माणशास्त्र विषयातील अभ्यासक्रमामध्ये होणारे गतीशील बदल आणि संशोधन यात वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून अनेक इंटरनॅशनल जरनल मध्ये रिसर्च पेपर (संशोधन लेख) प्रकाशित केले आहेत तसेच ते औषध निर्माण शास्त्रातील विद्यार्थ्यांना विशेषतः मराठवाड्यातील ग्रामीण भागातून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना संशोधनात्मक दृष्टिकोन ठेवून त्यांच्या सोबत वेगवेगळे प्रयोग करून पाहतात. विद्यार्थ्यांना नविन औषधे व त्या संदर्भातील उपकरणे कसे बनवावे याबद्दल मार्गदर्शन करतात. त्यांनी बनवलेल्या "पोर्टेबल ऑटो ॲनालायझर फॉर डिटेक्शन ऑफ कोलेस्टेरॉल इन ब्लड लेव्हल" या डिव्हॉईसची दखल घेत भारत सरकारच्या 'आय पी आय' (इंटेलेक्टूल प्रॉपर्टी इंडिया) संस्थेने त्यातील नावीन्य आणि विशेषता पाहता विविध पातळ्यांवर परीक्षणे नोंदवत नुकतेच त्यांचे स्वामित्व हक्क म्हणजे पेटंट ग्रँट केले.या बद्दल गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. यशवंत राजेभोसले आणि गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे प्राचार्य श्री. अमित बिंदू व सर्व स्टाफ यांनी प्रा. निखिल निळकंठ जाधव आणि प्रा. ऋषीकेश शिवाजीराव शेंडगे यांचा सत्कार करून अभिनंदन केले. या सत्काराच्या विशेष प्रसंगी सातत्याने सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे संचालक डॉ. यशवंत राजेभोसले यांनी प्राध्यापकांना कौतुकाची थाप देताना सांगितलेकी अश्या प्रकारचे राष्ट्रीय पातळीवरील संशोधन हे मराठवाड्यातील ग्रामीण भागातील सर्व सामान्य विद्यार्थ्यांना नवीन दिशा देण्याचे व संशोधनात्मक वृत्ती जोपासण्याचे काम करेल, तसेच यापुढील संशोधनासाठी व वैज्ञानिक उपक्रमासाठी ते कायम मदत करतील असे आश्वासन दिले आहे.

## वरपगाव जि.प.शाळेत शाळा पुर्व तयारी मेळाव्या

अबांजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील वरपगाव जि.प.शाळेत १९ एप्रील रोजी विविध मान्यवराच्या उपस्थीतीत शाळा पुर्व तयारी मेळाव्याचे अयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रशिक्षण संस्थेचे आधिव्याख्याते डॉ.योगेश सुरवसे,मुख्याध्याक बिडगर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शाळेच्या मुख्य प्रवेश व्दारा समोर रांगोळी सजावट तसेच सामाजीक ,विकासाचे बौध्दीक मानसीक ,भावनात्मक देखावे उभे करण्यात आले होते.प्रसंगी प्रशिक्षण संस्थेचे आधिव्याख्याते डॉ.योगेश सुरवसे यांनी विद्यार्थ्याना मार्गदर्शन केले. वयाच्या आठ वर्षापर्यंत मुलाच्या मेंदुचा ८०% विकास पुर्ण होतो त्या कालावधी पासुन शिक्षक व पालक यानी आपल्या मुलासाठी जागरुक राहुन शिक्षकाशी सुसंवाद साधुन एक कौटूंबीक नाते जपावे व मुलाच्या शारिरीक व मानसीक , सामाजीक विकास करण्यासाठी आपल्या योगदानाची गरज आसल्याचे सांगत मेळाव्यास उपस्थीतीत आसलेल्यामहिला ,पालक यांच्यासी सुसंवाध साधला.कार्यक्रमाचे प्रास्तावीक मुख्याध्याक बिडगर यानी सुत्रसंचलन तोकले तर आभार गालफाडे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी महामुनी मॅडम ,कुदळे मॅडम ,कुलकर्णी मॅडम तसेच अगंणवाडी सेवीका ,मदतनिस भाकरे, पिसाळ ,मुळे ,यानी परिश्रम घेतले.

## माजलगावात होणार अंजली जैन यांचा 'जैन भागवती दीक्षा महोत्सव'

### प.पू.प्रतिभाकंवरजी : वयाच्या पंधराव्या वर्षात 'अंजली' अंगीकारणार संयम मार्ग

माजलगाव । प्रतिनिधी

जैन धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी, भगवान महावीरांचे उपदेश जन माणसांपर्यंत पोहोचविण्यासाठी व स्वतःच्या आत्म कल्याणसह जनकल्याण करण्यासाठी छत्रपती संभाजीनगरची अंजली जैन वयाच्या १५ व्या वर्षी 'जैन भागवती दीक्षा' ग्रहण करून संयम मार्ग अंगीकारणार आहे. हा दीक्षा महोत्सव दिनांक २८ एप्रिल २०२४ रोजी माजलगाव येथील शिवप्रताप मंगल कार्यालय येथे सकाळी ९ वाजता होणार आहे अशी माहिती प.पू.प्रतिभाकंवरजी म.सा. यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.




पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, दीक्षा म्हणजे पंच महावृत्तांचे पालन करणे आहे जसे की, सत्य, अहिंसा, अचौर्य, ब्रह्मचर्य, अपरिग्रह या पंचमहाव्रतांचे कठोर पालन करण्यासाठी अंजली जैन ही जैन दीक्षा ग्रहण करत आहे. जैन दीक्षा ग्रहण करण्यासाठी कुठल्याही वयाची, जात किंवा धर्माची अट नसल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. अंजली यांनी जैन धर्मातील विविध आगमांचे अभ्यास, प्रतिक्रमण, जैन धर्माचे विविध सूत्र पाठांतर केल्यानंतर व संयम मार्गावर जाण्यासाठी परिपक्व झाल्यानंतर त्यांचा दीक्षा महोत्सव माजलगाव येथे संपन्न होत असल्याचे त्यांनी सांगितले. माजलगाव नगरी ही खूप पुण्यवान आहे त्याचे कारण की, इथे २२ साधू संतांच्या उपस्थितीमध्ये व या सर्वांच्या आशीर्वादाने अंजली यांचा दीक्षा महोत्सव संपन्न होणार आहे. माजलगावात मागील १०० वर्षांत कधीही असा कार्यक्रम झालेला नाही व भविष्यात कधी होईल याची शाश्वती नसल्याचेही त्यांनी सांगत दिनांक २४ एप्रिल पासून २८ एप्रिल पर्यंत होणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये बहुसंख्येने उपस्थित राहून न भूतो न भविष्यती असा अंजली जैन यांचा होणारा दीक्षा महोत्सव आपल्या डोळ्यांनी पाहण्यासाठी व अंजलीला आशीर्वाद देऊन तिचे अभिनंदन करण्यासाठी सर्वांना उपस्थित राहण्याचे आवाहन प.पू.प्रतिभाकंवरजी म.सा. यांनी केले आहे. यावेळी पत्रकार परिषदेला प.पू.सौरवमुनी म.सा., प.पू.गौरवमुनी म.सा. आदी ठाणा ४, प.पू.शालिभद्रजी म.सा., प.पू.प्रणवमुनीजी म.सा., प.पू.प्रफुल्लाजी म.सा., प.पू.सिद्धीसुधाजी म.सा. आदी ठाणा १६ तसेच श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सचिन रेदासनी, राजेंद्र दुगड, कुशल लोढा, संजय रेदासणी, धीरज खारिया, कुणाल श्रीश्रीमाळ, श्रीपाल मुनोत, प्रतिक ललवाणी आदी उपस्थित होते.

## डॉ.आंबेडकर जयंती निमित्त फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमालेचे आयोजन

परळी । प्रतिनिधी

परळीत कर्मचारी, पेंशनर्स व व्यवसायिक यांनी एकत्र येऊन विश्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक आदर्श जयंती उत्सव समितीची स्थापना करून १४ एप्रील रोजी परळी शहरातून ' महात्मा फुले-डॉ बाबासाहेब आंबेडकर ' संयुक्त जयंती काढून शहरातील लोकांपुढे एक आदर्श निर्माण केला, आणि आाता आज दिनांक २१ एप्रिल पासून व्याख्यानमाली सुरुवात होणार आहे.

फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमालेतून दिनांक २१ एप्रील ते २६ एप्रील या काळात शहरातील वैद्यनाथ औद्योगिक वसाहत, सभागृह येथे दररोज सांय. ७:०० ते ९: ०० यावेळेत विविध विषयावर व्याख्यान देण्यासाठी महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्याते यांना निमंत्रित करण्यात आले आहे.यामध्ये दि२१ एप्रील रोजी संभाजीनगर (औरंगाबाद) येथील फुले-आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक मा अरविंद खैरनार हे ' डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जडणघडणीत सत्यशोधक चळवळीचे योगदान' या विषयावर व्याख्यान देणार आहेत तर दि२३ एप्रील रोजी प्रा डॉ मनोहर सिरसाट यांचे ' डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीत सहभाग' तर दि२४ एप्रील रोजी डॉ भदंत उपगुप्त महाथेरो यांची धम्मदेसना - विज्ञान आणि मानवी मूल्ये हाच धम्माचा मूलाधार या विषयावर होणार आहे. दि २५ एप्रील रोजी महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे प्रा हनुमंत भोसले यांचे - अंधश्रद्धा-समज/ गैरसमज , प्रयोगासह सादरीकरण यावर व्याख्यान व प्रयोग होणार आहे , हा कार्यक्रम सुंगधकुटी बुद्ध विहार मैदान, भिमनगर येथे होणार आहे. दि२६ एप्रील रोजी महामानवाच्या वेशभूषा स्पर्धा व विद्यार्थ्यांचे ग्रूप डान्स, अशा विविध विषयांवर आधारित कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

दैनिक राज्य लोकतंत्र

महासंग्राम

सोमवार दि.२२ एप्रिल २०२४ | ६



# सोने, चांदी, डायमंडपासून कोकण ते व्हाया पुण्या मुंबईपर्यंत संपत्ती सहा वर्षात ४९ कोटींची वाढ, नारायण राणे कितीशे कोटींचे मालक?

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

नारायण राणे पहिल्यांदाच लोकसभेच्या रिंगणात असून त्यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर राणे यांची १३७ कोटींची संपत्ती असल्याचे जाहीर केले आहे. सोने, चांदी, डायमंडपासून कोकण ते व्हाया पुणे, मुंबईपर्यंत राणे कुटुंबाची संपत्ती आहे.

रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभेची जागा भाजपने शिवसेनेच्या शिंदे गटाकडून घेतली आहे. त्यामुळे कोकणातून धनुष्यबाण हद्दपार झाला आहे. भाजपच्या तीव्र दबावामुळे अखेर एकनाथ शिंदे गटाला दावा सोडून द्यावा लागला. या जागेवरून भाजपने नारायण राणे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. एकनाथ शिंदे सरकारमधील मंत्री उदय सामंत यांचे भाऊ किरण सामंत यांना या जागेवरून निवडणूक लढवायची होती. उद्धव ठाकरे गटाचे खासदार विनायक राऊत यांच्याशी त्यांचा सामना आहे. या निमित्ताने पुन्हा एकदा ठाकरे विरुद्ध राणे अशा फैरी प्रचारात झडतील.

राणे रत्नागिरी सिंधुदुर्ग मतदारसंघांमधील सर्वात श्रीमंत उमेदवार

नारायण राणे पहिल्यांदाच लोकसभेच्या रिंगणात असून त्यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत अर्ज दाखल केला. रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर राणे यांची १३७ कोटींची संपत्ती असल्याचे जाहीर केलं आहे. स्वतःसह पत्नी नीलम राणे आणि कौटुंबिक मिळून मालमत्ता त्यांनी जाहीर केली आहे. त्यामध्ये नारायण राणे यांची वैयक्तिक मालमत्ता ३५ कोटी रुपयांची आहे, राणे यांच्यासह पत्नी व कुटुंबीयांवर सुमारे २८ कोटींचे कर्ज आहे. त्यामुळे नारायण राणे रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघांमधील सर्वात श्रीमंत उमेदवार आहेत.



### नारायण राणेंच्या संपत्तीत ६ सहा वर्षात ४९ कोटींची वाढ

दरम्यान, सहा वर्षांपूर्वी राज्यसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातून उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या सात उमेदवारांमध्ये नारायण राणे सर्वात श्रीमंत उमेदवार होते. निवडणूक आयोगाला दिलेल्या शपथपत्रात ८८ कोटींची संपत्ती असल्याचे घोषित केले होते. त्यामुळे गेल्या सहा वर्षात त्यामध्ये ४९ कोटींची वाढ झाली आहे.

### कोकणपासून मुंबई पुण्यापर्यंत जमीन

पनवेल, वेंगुर्ला, कुडाळ, कणकवलीतील जानवलीमध्ये जमीन आहे, तर कणकवलीतील बंगला आहे. ही सर्व ८ कोटी ४१ लाख ४५ हजार ३३७ रुपयांची स्थावर मालमत्ता आहे. नीलम राणे यांच्याकडे पनवेल, जानवली, मालवणमध्ये गाळे, पुण्यात ऑफिस, मुंबई फ्लॅट अशी सुमारे ४१ कोटी एक लाख ८२,७६५ रुपयांचे स्थावर मालमत्ता असल्याचे प्रतिज्ञापत्रात म्हटलं आहे. नारायण राणे यांच्या नावावर विविध बँकांमध्ये १२ कोटींचे बँक डिपॉझिट, तर नीलम राणे यांच्या नावावर सव्वा दोन कोटींची बँक डिपॉझिट आहेत. दुसरीकडे, उमेदवारी जाहीर झाल्यानंतर नारायण राणे म्हणाले की, सिंधुदुर्ग रत्नागिरी जागेबाबत कोणतेही मतभेद नाहीत. मला उमेदवारी मिळणार हे आधीच माहीत होते. विकासाचा मुद्दा आणि मोदींचा चेहरा घेऊन आम्ही निवडणुकीला सामोरे जाणार आहोत.

### सोने-चांदी डायमंड कोटींचा ऐवज

शपथपत्रामध्ये जाहीर केलेल्या माहितीनुसार वार्षिक उत्पन्न मागील आर्थिक वर्षात ४९ लाख ५३ हजार २०७ रुपये आहे. पत्नीचे वार्षिक उत्पन्न ८७ लाख ७३ हजार ८८३ रुपये आहे. कौटुंबिक उत्पन्न १५ लाख ७ हजार ३८० रुपये आहे. नारायण राणे यांच्याकडे एक कोटी ७६ लाख ९६ हजार ५३६ रुपयांचे २५५२.२५ ग्रॅम सोने, तर ७८ लाख ८५ हजार ३७१ रुपयांचे डायमंड आहेत. नीलम राणे यांच्याकडे एक कोटी ३१ लाख ३७ हजार ८६७ रुपयांचे १८१९.९० ग्रॅम वजनाचे सोने आहे. १५ लाख ३८ हजार ५७२ रुपयांचे डायमंड आणि ९ लाख ३१ हजार २०० रुपयांची चांदी आहे. सोने-चांदी डायमंड असे करून कुटुंबाकडे ९ कोटी ३१ लाख ६६ हजार ६३१ रुपयांचा किमती एवज आहे.

# मेटेताईंची माघार अशोक हिंगे यांच्या पथ्यावर

**बीड । प्रतिनिधी**

शिवसंग्रामच्या नेत्या डॉ. ज्योतीताई मेटे यांनी दोन दिवसापूर्वी पत्रकार परिषद घेऊन आपण लोकसभा निवडणूक लढणार नाही असे जाहीर केले .मात्र कोणाला पाठिंबा द्यायचा याचा निर्णय राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत घेऊ असे त्यांनी सांगितले. गेल्या अनेक दिवसापासून स्वर्गीय विनायक मेटे हे मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी झटत होते. मात्र राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते शरद पवार यांच्याकडे त्यांनी उमेदवारी मागूनही त्यांना मिळाली नाही. त्यानंतर त्यांनी आपण निवडणूक लढणार नाही असा निर्णय जाहीर केला .मराठा आरक्षणात सक्रिय असलेल्या वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांना त्यांचा पाठिंबा मिळाला तर त्यांचे पारडे जड होईल .डॉ. ज्योतीताई मेटे यांची माघार वंचितचे अशोक हिंगे यांच्या पथ्यावर पडणार असल्याचे दिसत आहे. या संदर्भात अशोक हिंगे यांनीही आपण लवकरच ज्योतीताई मेटे यांची भेट घेणार असल्याचे स्पष्ट केले आहे. आता ज्योतीताई मेटे काय निर्णय घेतात याकडे लक्ष लागले आहे. सध्या तरी आरक्षणाच्या बाजूने जो उमेदवार सक्रिय राहिला त्यालाच पाठिंबा मिळेल अशी शक्यता दिसत आहे.

गेल्या काही दिवसापासून स्वर्गीय विनायक मेटे यांच्या पत्नी या सक्रिय





राजकारणात येण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्या उच्चपदस्थ अधिकारी आहेत मात्र काही महिन्यापूर्वी त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन त्यांनी राजकारणात सक्रिय होण्याचा निर्णय घेतला. बीड लोकसभेची उमेदवारी आपल्याला देण्यात यावी यासाठी त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते शरद पवार यांची भेटही घेतली. मात्र माशी कुठे जिंकली कोणास ठाऊक पवार साहेबांनी ज्योतीताई मेटे यांची उमेदवारी नाकारली आणि त्यानंतर त्यांनी लोकसभेची निवडणूक लढणार नाही. अशी घोषणा केली मात्र याचवेळी त्यांनी शिवसंग्राम ची राज्य कार्यकारणी बैठक झाल्यानंतरच आपण कोणाला पाठिंबा द्यायचा याचा निर्णय घेऊ अशी स्पष्ट केले. गेल्या अनेक वर्षापासून मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी स्वर्गीय विनायकराव मेटे हे प्रयत्नशील आहेत .मात्र त्यांच्या अपघाती निधनानंतर हा लढा अर्ध्यावरच राहिला. हा लढा पुढे मनोज जरांगे पाटील यांनी नेटाने पुढे नेला .त्यांच्या लढ्याला राज्यभरातून मराठा समाजाचा मोठा पाठिंबा मिळाला. या पाठिंबावरच सरकारला नमते घ्यावे लागले आणि काही प्रमाणात का होईना ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या त्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले .हे मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाचे यश च आहे .त्यानंतरही त्यांनी सगे सोयरे यांनाही आरक्षण मिळावे यासाठी लढा चालू ठेवला. मात्र दरम्यानच्या काळात लोकसभा निवडणुकीची आचारसहिता लागल्यानंतर हे आंदोलन स्थगित ठेवावे लागले. या आंदोलनामध्ये वंचित चे लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे सक्रिय सहभागी होते. सहाजिकच या लढ्यामध्ये काम करणारे मराठा क्रांती मोर्चाचे सर्व सहकारी आणि ज्यांनी आरक्षणासाठी अनेक वर्ष लढा दिला त्या स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्या पत्नी ज्योतीताई मेटे याही वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे यांना पाठिंबा देतील अशी सध्या तरी शक्यता वर्तवली जात आहे. येत्या काही दिवसात शिवसंग्राम ची राज्य कार्यकारिणीची बैठक झाल्यानंतर ज्योतीताई मेटे अशोक हिंगे यांना पाठिंबा देतील. असे राजकीय जाणकारांचे मत आहे .आगामी दोन-चार दिवसातच ज्योतीताई कोणाला पाठिंबा देतात हे स्पष्ट होणार आहे सध्या तरी त्यांचा अशोक हिंगे यांना पाठिंबा मिळेल अशी जोरदार चर्चा बीड जिल्ह्यामध्ये सुरू आहे. अशोक हिंगे यांना पाठिंबा मिळाला तर त्यांचे पारडे जड होईल आणि ते या निवडणुकीत विजयी होतील. अशी चर्चा राजकीय जाणकार करीत आहेत.

# शिंदे गटाच्या आमदाराने काढली शरद पवारांची लायकी, म्हणतो तुम्ही आता...

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे राजकारण चांगलेच तापले आहे. आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडी लागल्या आहेत. अशातच शिवसेना शिंदे गटाचे कोरेगाव मतदार संघाचे आमदार महेश शिंदे यांची शरद पवार यांच्यावर तोफ डागली आहे. यशवंत विचारांवर बोलण्याची शरद पवारांची लायकी नाही अशी टीका कोरेगावचे शिवसेना आमदार महेश शिंदे यांची यांनी केली आहे.

शरद पवारांना यशवंत विचारांचा विसर पडला आहे त्यामुळे यशवंत विचारांवर बोलण्याची शरद पवारांची लायकी नाही अशी टीका कोरेगावचे शिवसेना आमदार महेश शिंदे यांनी केली आहे. सातारा लोकसभेसाठी महाविकास आघाडीकडून शशिकांत उमेदवारी देण्यात आली आहे. मात्र, अशा भ्रष्टाचाराचे आरोप असणाऱ्या व्यक्तीला शरद पवारांनी उमेदवारी दिल्याने आ.महेश शिंदे यांनी हे आरोप केले आहेत. नवी मुंबई बाजार समितीच्या गाळ्यांमध्ये शशिकांत शिंदे यांनी भ्रष्टाचार केल्याचा महेश शिंदे यांचा आरोप आहे. सातारा लोकसभा मतदार संघात शशिकांत शिंदे यांची उदयनराजे यांच्याशी लढत होणार आहे.

शशिकांत शिंदे यांच्याविरोधात घोटाळ्याचे आरोप करत सादर केले पुरावे

आमदार महेश शिंदेंनी मविआचे शशिकांत शिंदे यांच्यावर ४ हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप केला होता. वाशी मार्केट मधील १ हजार स्क्वेअर फुटाचे गाळे अवघ्या ५ लाखाला विकून भ्रष्टाचार केल्याचं महेश शिंदेनी सांगितले होते. याबाबत न्यायालयानं गुन्हा दाखल करण्याबाबत दिलेल्या आदेशाची कागदपत्रेही त्यांनी सादर केली होती. साताऱ्यातील कोरेगावचे आमदार महेश शिंदेंकडून रडीचा डाव केला जात असून, मी दोषी आढळल्यास उमेदवारी अर्ज भरणार नाही असं वक्तव्य आमदार शशिकांत शिंदेंनी केले आहे. नवी मुंबई बाजार समितीच्या गाळे विक्री प्रकरणात ४ हजार कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप महेश शिंदेंनी त्यांच्यावर केला होता. त्यानंतर शशिकांत शिंदेंनी हे प्रत्युत्तर दिले आहे.

# अजितदादांच्या उमेदवाराला लीड देण्यासाठी फडणवीसांच्या आमदारांमध्ये पैज, ओमराजेंविरोधात दोघांनी दंड थोपटले

धाराशिव । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात भाजप आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांना उमेदवारी दिली आहे. दरम्यान, अर्चना पाटील यांना कोण जास्त लीड मिळवून देणार? यावरुन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या दोन विश्वासू आमदारांमध्ये शर्यत लागली आहे. अजित पवार यांच्या उपस्थितीत अर्चना पाटील यांनी शक्तीप्रदर्शन केले. त्यानंतर औसाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी याबाबतचा खुलासा केला आहे.

अर्चना पाटील यांनी अजित पवारांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज भरला. यावेळी बोलताना पवार म्हणाले, आजच्या सभेची गर्दी पाहून विरोधकांना धडकी भरली असेल. आज धडाकेबाज पद्धतीने फॉर्म भरलेला आहे. समोरच्या उमेदवाराचे डिपॉजिट जप्त होण्याचेच फक्त बाकी आहे. आपण नरेंद्र मोदींना पुन्हा एकदा पंतप्रधान करण्यासाठी आपण सर्वजण उत्सुक आहोत, असेही अभिमन्यू पवार यांनी स्पष्ट केले. यावेळी पवार यांनी अबकी बार ४०० पारच्या घोषणाही दिल्या.

काय म्हणाले अभिमन्यू पवार ?

राजा राऊत आणि माझी शर्यत लागलेली आहे. अर्चना पाटील यांना सर्वांत जास्त लीड कोण देणार? औसेकर देणार की, बार्शीकर देणार ? असा सवाल सभेला उपस्थित नागरिकांना करत अभिमन्यू पवार यांनी पैजेबाबत भाष्य केले आहे. शिवाय औसामधूनच अर्चना पाटील यांना सर्वाधिक लीड मिळेल, असा दावा अभिमन्यू पवार यांनी केला आहे.

### अशी लागली पैज

अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी ३९९ जागांचा फैसला केलेला आहे. ४०० वा आकडा आपला असणार आहे. जागा निवडून आणणार की नाही? ४०० वा आकडा आपला होणार की नाही? माझी आणि राजाभाऊ यांची शर्यत लागली आहे. औसेकर देणार की बार्शीकर देणार, असेही अभिमन्यू पवार यांनी सांगितले. त्यामुळे औसाचे आमदार अभिमन्यू पवार आणि राजेंद्र राऊत यांनी ठाकरेंचे उमेदवार ओमराजे निंबाळकर यांच्याविरोधात दंड थोपटले आहेत. दोघांनीही अर्चना पाटील यांना सर्वांत जास्त लीड देण्याचा चंग बांधला आहे. धाराशिव लोकसभेत पारंपारिक प्रतिस्पर्धी असेलेले पाटील -निंबाळकर घराणे आमने सामने आले आहे. त्यामुळे धाराशिवच्या लढतीकडे सर्वांचे लक्ष आहे.

# एमआयएमचा शाहू महाराजांना पाठिंबा

## मंडलिकांची डोकेदुखी वाढली, एका निर्णयामुळे कोल्हापुरात गणित बदलणार?

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

राज्यात सध्या सगळीकडे लोकसभा निवडणुकीचे वातावरण आहे. प्रत्येक उमेदवार आपापल्या मतदारसंघात जोमाने प्रचार करतोय. काहीही झालं तरी मीच विजयी होणार, असा दावा प्रत्येक उमेदवाराकडून केला जातोय. मतदारसंघात ताकद वाढवण्यासाठी वेगवेगळ्या नेत्यांच्या पाठिंब्यासाठी उमेदवारांकडून प्रयत्न केला जातोय. या लोकसभा निवडणुकीत कोल्हापूर मतदारसंघाची विशेष चर्चा होत आहे. कारण या जागेवर राजघराण्यातील छत्रपती शाहू महाराज निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे या जागेवर नेमका कोणाचा विजय होणार? याकडे सर्वांचंच लक्ष लागलं आहे. दरम्यान, या निवडणुकीत शाहू



महाराजांची ताकद चांगलीच वाढली आहे. कारण या जागेसाठी त्यांना एमआयएमने पाठिंबा दिला आहे.

एमआयएमचे नेते तथा छत्रपती संभाजीनगरचे विद्यमान खासदार इम्तियाज जलील यांनी आज (२१ एप्रिल) पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी एमआयएम पक्षाची कोल्हापूर मतदारसंघासाठीची भूमिका स्पष्ट केली. आम्ही कोल्हापुरात छत्रपती शाहू महाराज यांना पाठिंबा देत आहोत, असे यावेळी जलील यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रातील प्रामुख्याने मुस्लीम समाज एमआयएमचा मतदार आहे. कोल्हापुरातही मुस्लिमांची संख्या लक्षणीय आहे. असे असताना एमआयएमने पाठिंबा दिल्याने एका प्रकारे शाहू महाराजांची ताकद वाढणार आहे.

### वंचितचाही शाहू महाराजांना बिनशर्त पाठिंबा

वंचित बहुजन आघाडीनेदेखील या जागेवर आपला उमेदवार उभा केलेला नाही. वंचितने या जागेवर छत्रपती शाहू महाराजंना बिनशर्त पाठिंबा दिला आहे. वंचित बहुजन आघाडीचा महाविकास आघाडीत समावेश व्हावा यासाठी मविआच्या नेत्यांनी बरेच प्रयत्न केले. गेल्या काही महिन्यांत त्यासाठी वंचितचे आणि मविआच्या नेत्यांत अनेक बैठका झाल्या. मात्र शेवटपर्यंत या प्रयत्नांना यश आले नाही. शेवटी आता वंचित बहुजन आघाडीने वेगवेगळ्या मतदारसंघावर आपले उमेदवार उभे केले आहेत. मात्र वंचितचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी मात्र कोल्हापूरच्या जागेवर कोणताही उमेदवार दिलेला नाही.

# एकाच जिल्ह्यात एकाच पोलिस ठाण्यात तबल ३१ गुन्हे दाखल

## शरद पवार पक्षाचा माढा मतसंघातील उमेदवार पुन्हा चर्चेत

**माढा । प्रतिनिधी**

निवडणुकीत गुन्हेगारांना तिकीट का दिलं हे आता जाहीर करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. उमेदवार आणि राजकीय पक्षांनाही निवडणुकीआधी मतदारांना उमेदवारांचा गुन्हेगारी रेकॉर्ड सांगावा लागतो. गुन्हेगारांचा राजकारणात प्रवेश रोखण्यासाठी निवडणूक आयोगाने हे मोठं पाऊल उचललं आहे.

: माढा लोकसभेसाठी धैर्यशील मोहिते पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. धैर्यशील मोहिते पाटील हे महाविकासआघाडीचे राष्ट्रवादी शरद पवारचंद्र गटाचे उमेदवार आहेत. काही मोजक्या कार्यकर्त्यांसोबत त्यांनी उमेदवारी अर्ज भरला. ते आता महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असतील. शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्यांसाठी लढणार, असा विश्वास धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त केलाय. दरम्यान धैर्यशील मोहिते पाटील उमेदवारी चर्चेत आलेय ती त्यांच्यावर दाखल असलेल्या गुन्ह्यांमुळे. धैर्यशील मोहिते पाटील यांच्यावर एकाच जिल्ह्यात एकाच पोलिस ठाण्यात तब्बल ३१ गुन्हे दाखल आहेत. यांचे खटले न्यायालयात सुरु आहेत.गेल्यावेळी मोहिते पाटलांमुळे माढ्यामध्ये भाजप खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकरांना दीड लाखांचं मताधिक्य मिळालं होतं. आता रणजितसिंहांच्या विरोधात मोहितेंनी बंडाचं निशाण फडकवलंय. माढामधून धैर्यशील मोहिते पाटील राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी काही दिवसांपूर्वीच भाजपची साथ सोडून शरद पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत माढामध्ये हा प्रवेश सोहळा झाला. महाविकास आघाडीकडून धैर्यशील मोहितेंना माढाची उमेदवारी मिळाली आहे.

# बजरंग सोनवणेंनी घेतली माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस यांची भेट

## शहराचा'माऊस'हाताळणाऱ्या 'चाऊस'यांच्या निर्णयाची उत्सुकता; स्वयंघोषित पुढाऱ्यांच्या पायाखालची सरकली जमीन

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड लोकसभा निवडणुकीचा रंग दिवसेंदिवस रंगताना दिसत आहे. अत्यंत अटीतटीच्या सामन्यात होणारी ही निवडणूक राज्याचे लक्ष वेधून आहे.दरम्यान आपले पारडे जड करण्याच्या उद्देशाने महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे यांनी'शहर किंग'म्हणून परिचित असणारे माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस यांची सदिच्छा भेट घेतली. भेटीतील चर्चा गुलदस्त्यात आहे. परंतु शहरातील सामाजिक राजकीय घडामोडीच्या किबोर्डचा 'माऊस'हाताळणारे'चाऊस' भेटीनंतर काय भूमिका घेतात याची उत्सुकता आहे.दरम्यान चाऊस यांच्या राजकिय निर्णयाचा कल बप्पांना मिळन्याची शक्यता आहे. त्यामुळे तालुक्यात मताचा फायदा बप्पांना होणार आहे.तर या निर्णयाने शहरातील स्वयघोषित पुढाऱ्यांच्या पायाखालची जमीन मात्र सरकताना दिसत आहे.

गेल्या अडीच तीन वर्षापासून सहाल चाऊस राजकारणात न्यूट्रल आहेत.आपला व्यवसाय आणि आपले सामाजिक कार्य या व्यतिरिक्त ते कुठल्याही राजकीय व्यासपीठावर वावरताना दिसत नाहीत.दरम्यानच्या काळात त्यांनी आ.प्रकाश सोळंके यांच्यासोबत समझोता केला असल्याच्या अफवा ऐकायला मिळत होत्या.ते या पक्षासोबत जातील.ते,त्या पक्षा सोबत जातील आशा अनेक राजकीय आटकली लावण्याचे पेवही फुठले होते.परंतु चाऊस यांची भूमिका'न्यूट्रलच'दिसत होती.



शहरातील राजकारनावर, समाजमनावर त्यांची मोठी पकड आहे.त्यामुळे त्यांच्या राजकीय भूमिकेकडे अनेकांचे लक्ष लागून आहे.लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तरी ते राजकीय निर्णय घेतील अशी चर्चा आहे. परंतु अद्यापही ते मौन आहेत.अशा मनस्थितीत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे यांनी चाऊस यांची भेट घेतली.

दरम्यान भेटीतील चर्चा गुलदस्त्यात आहे.या भेटीनंतरच्या काळात चाऊस कुठली राजकीय भूमिका घेतील?ते बजरंगबप्पा सोनवणे यांना फक्त लोकसभा निवडणूकी पुरते सहकार्य करतात का?

का शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करतात?का उद्धव ठाकरे यांची मशाल हाती घेतात?का शिंदे सेनेचा धनुष्य उचलतात?का राजकारणात न्यूट्रलच राहतात?अशा अनेक आटकली लावल्या जात आहेत. परंतु येत्या दोन चार दिवसात ते आपलं मौन सोडून राजकीय निर्णय घेण्याची शक्यता आहे.त्यामुळे शहराचा'माऊस'हाताळणाऱ्या 'चाऊस'यांच्या राजकीय निर्णयाबाबद तालुक्याच्या राजकीय वर्तुळात उत्सुकता लागून आहे. त्यांच्या राजकीय निर्णयानंतर शहरातील राजकीय घडामोडीत मोठा बदल होण्याचे संकेत आहेत. आजच्या राजकीय,सामाजिक वातावरणाचा कल पाहता ते बजरंगबप्पांना सहकार्य करतील असा अंदाज आहे.असे झाल्यास मताचा मोठा फायदा बप्पांना होऊ शकतो अशी चर्चा आहे.दरम्यान चाऊस यांच्या राजकीय निर्णयाच्या हालचालीने शहरातील अनेक स्वयंघोषित पुढाऱ्यांच्या पायाखालची जमीन सरकताना दिसत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सुलभ आणि शांततापूर्ण मतदानासाठी आवश्यक प्रयत्न करा-एस.चोक्कलिंगम

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील चारही मतदारसंघात मतदानाचे प्रमाण वाढावे आणि मतदारांना सुलभपणे तसेच शांततापूर्ण वातावरणात मतदान करता यावे यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावे; त्यादृष्टीने मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा करण्यासोबत त्याची माहिती मतदारांना द्यावी, असे निर्देश राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित निवडणूक विषयक आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी तथा पुणे लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुहास दिवसे, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, बारामती लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक निरीक्षक आनंधी पालानीस्वामी, निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी, निवडणूक खर्च निरीक्षक विजय कुमार, निवडणूक पोलीस निरीक्षक जॉएस लाल्लरेमावी, मावळ मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला, पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, शिरुर मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे आदी उपस्थित होते.

आगामी लोकसभा निवडणुका मुक्त, निर्भय, व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने सर्व घटकांनी समन्वयाने काम करावे, असे सांगून श्री. चोक्कलिंगम म्हणाले, एकापेक्षा अधिक मतदान केंद्र असलेल्या ठिकाणी मतदार मदत कक्ष ठेवण्यात यावा. मतदारांना रांगेत उभे राहावे लागू नये यासाठी शक्य असल्यास शहरी भागात प्रतीक्षा कक्षाची सुविधा करावी. उद्योग संस्थांच्या प्रतिनिधींना मतदानाच्या दिवशी कामगारांना मतदानासाठी पगारी रजा देण्याच्या सूचना द्याव्यात.

निवडणूक प्रक्रिया सुरू असताना कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही यावर विशेष लक्ष ठेवावे. कोठेही अशी घटना लक्षात आल्यास वेळीच उपाययोजना करा. मतदान संबंधी सर्व अहवाल वेळेत सादर करावे. वेबकास्टिंगद्वारे नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून मतदान प्रक्रियेवर लक्ष ठेवावे. सी-व्हिजिलवर प्राप्त तक्रारींचे १०० मिनिटात निवारण करावे. मतदानाच्या वेळी येणाऱ्या अडचणी टाळण्यासाठी मतदान केंद्र पथकाला मतदान आणि ईव्हीएमविषयक सूक्ष्म बाबींचे प्रशिक्षण द्यावे.

निवडणुकीत पैसा, मद्य तसेच इतर कोणत्याही स्वरुपातील आमिषाचे वाटप तसेच बळाचा वापर होऊ नये यासाठी विशेष लक्ष द्यावे. दिव्यांग मतदारांना सुलभपणे मतदान करता यावे यासाठी आवश्यक सुविधा देण्यात याव्यात. समाजमाध्यमाद्वारे चुकीचे संदेश पसरविणाऱ्यांवर पोलिसांनी तात्काळ कारवाई करावी, आदी सूचना त्यांनी दिल्या.

निवडणूक विषयक नियमांचे उल्लंघन कोणत्याही घटकाद्वारे होऊ नये यासाठी पोलीस विभागासोबत सर्व संबंधित विभागांनी दक्ष राहावे. कमी मतदान असलेल्या १० मतदान केंद्रावर लक्ष केंद्रित करून हे प्रमाण वाढविण्यासाठी ग्रामस्तरावरील कर्मचाऱ्यांना विशेष प्रयत्न करण्याच्या सूचना द्याव्यात. मतदार माहिती स्लीप आणि माहिती पत्रकाचे वाटप वेळेवर करावे. मतदानाचे प्रमाण वाढविण्यात महानगरपालिका आणि नगरपालिकांची भूमिका महत्त्वाची असून त्यासाठी आवश्यक प्रयत्न करावे, असेही श्री.चोक्कलिंगम म्हणाले.

पोलीस आयुक्त अमितेशकुमार, श्री.चौबे आणि पोलीस अधीक्षक श्री.देशमुख यांनी पोलीस विभागाने केलेल्या तयारीची माहिती दिली. निवडणुका शांततेत पार पाडण्यासाठी सुरक्षेच्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी डॉ.दिवसे यांनी सदारीकरणाद्वारे जिल्ह्यातील निवडणूक तयारीची माहिती दिली. पोलीस विभागाच्या सहकार्याने निवडणुकीसाठी सर्व तयारी पूर्ण झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

मावळ, बारामती आणि शिरूर मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनीही निवडणूक तयारीची माहिती सादर केली. बैठकीनंतर मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी भारतीय खाद्य महामंडळाच्या गोदामाला भेट देऊन मतमोजणीसाठी करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती घेतली.

## धक्कादायक! आईची चिमुरड्यासह इमारतीवरून उडी घेऊन आत्महत्या

**पुणे । प्रतिनिधी**

सिजोफेनिया आजाराने ग्रस्त असलेल्या आईने आपल्या ४ वर्षांच्या मुलाला कडेवर घेऊन राहत्या इमारतीच्या नवव्या मजल्यावरून उडी मारून केली आत्महत्या. पिंपरी चिंचवड शहरातील वाकड भागात असलेल्या रीगालिया या उच्च - भ्रू सोसायटी मध्ये सकाळी ही घटना घडली.

कोमल जगदीश हरिश्चंद्र (वय ३२, रा. रिगालिया, सोसायटी) असे आत्महत्या केलेल्या आईचे नाव आहे. कोमल यांनी तिने इमारतीमधून उडी मारताना आपला चार वर्षांचा मुलगा विहान संकेत आवटे याला कडेवर घेऊन उडी मारली.

शनिवारी सकाळी साडे आठच्या पूर्वी ही घटना घडली आहे. कोमल यांच्यावर परदेशात तसेच भारतात सध्या उपचार सुरू होते. या प्रकारानंतर त्यांचे कुटुंबीय आणि शेजारी पुरते हादरून गेले असून, याबाबत सायंकाळी उशिरा पर्यंत अधिक माहिती मिळू शकली नाही. वाकड पोलीस तपास करीत आहेत.

## बांगड्या भरणारे हातच असतात कणखर : खासदार डॉ. मेधा कुलकर्णी

**पुणे । प्रतिनिधी**

तेजस्विनी पुरस्कारासाठी आपण सार्थ ठरावे ही स्वत:कडून अपेक्षा-जाणीव ठेवत पुरस्काराला न्याय देणे घडावे ज्यायोगे तेजस्विनी पुरस्कार सार्थ ठरेल. जेथे जेथे तेजस्विनी, रणरागिणी अवतार धारण करावा लागतो तेथे तेथे त्या भूमिकेला न्याय द्यायला ते ते रागरंग धारण करावेत, असा संदेश देणारा हा पुरस्कार आहे, अशा भावना खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केल्या.

रंगत-संगत प्रतिष्ठान आणि करम प्रतिष्ठानतर्फे प्रेरणादायी व्यक्तिमत्वास देण्यात येणारा 'तेजस्विनी' पुरस्कार खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांना रविवारी (दि. २१) प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारल्यानंतर त्या सत्काराला उत्तर देताना बोलत होत्या. रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ड. प्रमोद आडकर आणि करम प्रतिष्ठानचे अध्यक्ष भूषण कटककर यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण झाले. मैथिली आडकर, प्रज्ञा महाजन, यांची विशेष उपस्थिती होती. शाल, श्रीफळ, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. पत्रकार भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

ॲड. प्रमोद आडकर यांनी प्रास्ताविकात पुणेकरांनी डॉ. कुलकर्णी यांचा नगरसेविकेपासून खासदारकीपर्यंतचा उल्लेखनीय प्रवास पाहिला आहे. मुलींनी आत्मनिर्भर करण्यासाठी शाळा पातळीवर उपक्रम राबविले जावेत यासाठी पाठपुरावा करावा, अशी विनंती ॲड. आडकर यांनी खासदार कुलकर्णी यांच्याकडे केली. संयम, चिकाटी असणारे कणखर



**कला-साहित्याच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांविषयी जागृती व्हावी : खासदार डॉ. मेधा कुलकर्णी**

**रंगत संगत प्रतिष्ठान व करम प्रतिष्ठानतर्फे खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांचा 'तेजस्विनी' पुरस्काराने गौरव**

व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. मेधा कुलकर्णी होत, असे गौरवोद्गार भूषण कटककर यांनी मनोगतात काढले. करम प्रतिष्ठान सामाजिक क्षेत्रात करीत असलेल्या कार्याचीही त्यांनी माहिती सांगितली. मला सांस्कृतिक क्षेत्राची आवड आहे, असे नमूद करून खासदार डॉ. कुलकर्णी यांनी कलाकार-साहित्यिकांनी देखील सामाजिक विषयांवर लिखाण करत आपल्या कलेच्या-साहित्याच्या माध्यमातून जनजागृती करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. कलेच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तिंना समाजजीवनाशी तुटलेपण असते; परंतु त्याच्या भोवती असलेल्या एका वेगळ्या प्रभावळीचा त्यांनी पुरेपूर उपयोग करत सामाजिक विषयांना जोडून घ्यावे. विपरित परिस्थितीत मुलींना शिकविणाऱ्या माता व वृद्धाश्रमचालिका यांचा सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून करम प्रतिष्ठानतर्फे सन्मान खासदार डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. हा धागा पकडून डॉ. कुलकर्णी म्हणाल्या, आजच्या काळात मुली चांगल्याप्रकारे शिकत आहेत तर मुले मात्र शिक्षणाचे महत्त्व न जाणता वाईट मार्गाला जात आहेत. अशा वेळी मुलींनी जराही मागे न पडता आपल्या आईच्या कार्यकर्तृत्वाला सलाम करत प्रेरणादायी मानले पाहिजे; कारण बांगड्या भरणारे हात नेहमी कणखरच असतात. समर्पित बाईपणाची तुम्ही आरती केली आहेत असे गौरवोद्गारही त्यांनी करम प्रतिष्ठानच्या कार्याविषयी काढले.खासदार डॉ. कुलकर्णी यांचा परिचय अपर्णा डोळे यांनी करून दिला तर सन्मानपत्राचे वाचन वर्षा कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन शिल्पा देशपांडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या द्वितीय सत्रात स्वरचित मराठी गझल संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यात वर्षा कुलकर्णी, मिलिंद छत्रे, डॉ. मंदार खरे, सुजाता पवार, स्वाती यादव, वैशाली माळी, प्राजक्ता वेदपाठक, डॉ. दाक्षायणी पंडित, कामिनी केंभावी, अजय जोशी, रुपाली अवचरे, मृदुला खैरनार-कुलकर्णी, कविता क्षीरसागर, स्वप्नील पोरे यांचा सहभाग होता. गझल संमेलनाचे सूत्रसंचालन भूषण कटककर यांनी केले.

## आता 'एक्स्प्रेस वे'वर जा सुसाट; कारला समतल भागात १०० ची वेगमर्यादा

**पुणे । प्रतिनिधी**

अपघात रोखण्यासाठी आणि वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी महामार्ग पोलिसांकडून पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. यात कारला समतल भागात १०० तर घाट परिसरात ६० वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

ही वेगमर्यादा पूर्वीपेक्षा अधिक असल्याने वाहने आता वेगाने धावणार आहेत. या मर्यादेचे उल्लंघन केल्यास वाहनचालकांवर सीसीटीव्ही आणि स्पीडगनच्या माध्यमातून दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.पुणे-मुंबई-पुणे अंतर कमी करण्यासाठी या एक्स्प्रेस वेची म्हणजेच यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गाची निर्मिती करण्यात आली. मात्र या मार्गावर गेल्या काही वर्षांत प्रचंड अपघात झाले आहेत. या अपघातांमध्ये अनेकांना जीव गमवावे लागले आहेत. हे रोखण्यासाठी महामार्ग पोलिसांकडून



गेल्या काही वर्षांपासून ठोस पावले उचलली जात आहेत. आता वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. अप्पर पोलिस महासंचालक (वाहतूक) सुखविंदर सिंग यांनी दिलेल्या आदेशानुसार आता पुणे-मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर वेग मर्यादेची कडक अंमलबजावणी केली जाणार आहे.

म्हणून वेगमर्यादा केली निश्चित

पुणे-मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे हा एकूण ९४ किलोमीटरचा असून या महामार्गावर ३५ ते ५२ कि.मी. या टप्प्यामध्ये घाटभाग म्हणजेच बोर घाट आहे. सद्य:स्थितीत या द्रुतगती महामार्गावरील समतल भागासाठी असलेली वेगमर्यादा १०० किलोमीटर प्रतितास असून घाटभागामध्ये आल्यानंतर वेगमर्यादा ५० कि.मी. प्रतितास आहे. मात्र घाटभागातील ही वेगमर्यादा हलक्या वाहनांसाठी अत्यंत कमी असून पुणे ते मुंबई वाहिनीवर अतितीव्र उतार आहे. समतल भागातून १०० किलोमीटर प्रतितास याप्रमाणे प्रवास केल्यानंतर घाटभागात आल्यावर वाहनाची वेगमर्यादा ५० कि.मी.वर आणताना वाहन चालकांना अडचणी निर्माण होतात. तसेच वाहन चालकाने वाहनांचा वेग जलदगतीने कमी केल्याने अनेक अपघात घडल्याचे समोर आले आहे. त्यामुळे वाहनांच्या वर्गानुरूप वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

अशी असणार वेगमर्यादा

प्रवासी मोटार वाहने, ८ प्रवासी वाहणारी : १०० किमी/प्रतितास : ६० किमी/प्रतितास

प्रवासी वाहने, ९ पेक्षा अधिक प्रवासी वाहणारी : ८० किमी/प्रतितास : ४० किमी/प्रतितास

मालवाहतुकीची वाहने : ८० किमी/प्रतितास : ४० किमी/प्रतितास

## चार बांग्लादेशीसह नऊ महिला ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने बुधवार पेठेमधील वेश्या वस्तीत कारवाई करीत नऊ महिलांना ताब्यात घेण्यात आले. यामध्ये चार बांग्लादेशी घुसखोर महिलांना पकडण्यात आले आहे. या माहिला मागील बारा वर्षांपासून भारतात बेकायदेशीर पद्धतीने वास्तव्य करीत असल्याचे समोर आले आहे. त्यांच्याविरुद्ध फरासखाना पोलीस ठाण्यात पारपत्र अधिनियम, तसेच परकीय नागरिक कायद्यातील कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर, उर्वरीत पाच महिलांविरुद्ध सार्वजनिक ठिकाणी अश्लील हावभाव केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मासुका कलाम फकीर उर्फ शेख (वय २५), पिया नाझ्मुल सरदार उर्फ शेख (वय २७), रुजी हारून शेख (वय ३८), रूपा आकाश मंडोल (वय ४०, सध्या रा. बुधवार पेठ, मूळ, रा. बांगलादेश) अशी अटक करण्यात आलेल्या महिलांची नावे आहेत. त्यांच्याकडे भारतातील वास्तव्याची कोणतीही अधिकृत कागदपत्रे चौकशीत आढळून आली नाहीत. मासूका, पिया, रूजी व रुपा या चौघी बुधवार पेठेमधील एका कुंटणखाण्यात मागील बारा वर्षांपासून वेश्या व्यवसाय करीत होत्या. तसेच, तिथेच रहात होत्या. बांग्लादेशामधून त्या भारतात आल्यानंतर दलालामार्फत बुधवार पेठेत आल्या. त्यानंतर त्यांनी येथील कुंटणखान्यात राहून वेश्या व्यवसाय सुरू केला. बुधवार पेठेतील कुंटणखान्यात बांग्लादेशी महिला असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाचे पोलीस शिपाई तुषार भिवरकर यांना मिळाली होती. त्यानुसार, वरिष्ठ निरीक्षक भरत जाधव, सहायक निरीक्षक अनिकेत पोटे, राजेश माळेगावे, उपनिरीक्षक अश्विनी भोसले यांच्या पथकांनी छापे टाकले. या कुंटणखान्यातून नऊ महिलांना ताब्यात घेण्यात आले होते.

ही कारवाई गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भरत जाधव, सहायक पोलीस निरीक्षक राजेश माळेगावे, अनिकेत पोटे, पोलीस उपनिरीक्षक अश्विनी भोसले, तुषार भिवरकर, सागर केकाण, अमेय रसाळ, इम्रान नदाफ, संदीप कोळगे, राजेंद्र कुमावत, बाबा कर्पे, मनिषा पुकाळे, रेश्मा कंक यांनी ही कारवाई केली.

## मृतदेहाच्या अवस्थेवरून मृत्यूची अचूक वेळ सांगणारा किडा सापडला!

**पुणे । प्रतिनिधी**

माणसाच्या मृत्यूची वेळ किडा सांगणार, असे म्हटले तर तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसेल. पण, हे खरंय. पुण्याच्या झूलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या एका महिला शास्त्रज्ञाने या किड्याचा शोध लावला आहे. त्याला 'मोरेश्वर किडा' असे मराठी नाव दिले आहे. हे संशोधन न्याय वैद्यकशास्त्रासाठी मैलाचा दगड ठरणार असल्याचा दावा महिला शास्त्रज्ञ डॉ. अपर्णा कलावटे यांनी केला आहे. सध्या एखाद्या माणसाच्या मृत्यूची वेळ ठरविण्यासाठी न्याय वैद्यकशास्त्राचे अनुमान गृहीत धरले जाते.



त्यासाठी मृतदेहाची उत्तरीय तपासणी करण्यात येते. त्यानंतर विविध प्रकारच्या रासायनिक चाचण्या करून संबंधित मृतदेहाची मृत्यूची वेळ निश्चित केली जाते. मात्र, ही वेळ सांगणारा किडा पृथ्वीवर आहे अन् तोही चक्क पुणे शहराजवळील अष्टविनायकांपैकी एक असलेल्या मोरगावात आहे. ही बाब जगाला प्रथमच पुणे शहरातील झुलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या शास्त्रज्ञ डॉ. अपर्णा सुरेशचंद्र कलावटे यांनी संशोधन करून सांगितली आहे. त्यांचे हे संशोधन न्यूझीलंड येथून प्रसिद्ध होणार्या 'झुटेक्सा' या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये १४ एप्रिल २०२४ रोजी प्रसिद्ध झाले आहे.

मोरगावातील मयूरेश्वर मंदिराजवळ सापडलेला हा किडा 'ट्रोगिड' या कीटकांच्या कुटुंबातील आहे. त्यात एकूण नऊ प्रजाती आतापर्यंत जगातील शास्त्रज्ञांनी शोधल्या होत्या. हा दहावा किडा डॉ. अपर्णा यांनी जगाला शोधून दिला आहे. हा किडा अस्तित्वात असूनही त्याच्यापर्यंत कुणी पोहोचलेले नव्हते. ते संशोधन जगात प्रथम पुण्यात झाले.

**दक्षिण आफ्रिकेतील शास्त्रज्ञाचाही सहभाग**

डॉ. अपर्णा कलावटे या आकुर्डी (पुणे) येथील भारतीय प्राणी सर्वेक्षण, पश्चिमी प्रादेशिक केंद्र (झुलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया) येथे शास्त्रज्ञ आहेत. या संशोधनात त्यांना दक्षिण आफ्रिका देशातील प्रिटोरिया प्रांतातील डिट्सॉंग नॅशनल म्युझियम ऑफ नॅचरल हिस्ट्रीचे संचालक वर्नर स्ट्रम्फर यांनी सहकार्य केले. या शोधनिबंधाचे ते सहलेखक आहेत.

**मृतदेह खाऊन निसर्ग स्वच्छतेचे काम करतो**

जमिनीत माणसाचा मृतदेह कुजून जातो व शेवटी सापळा राहतो, अशी माहिती आपल्याला आहे. मात्र, हा कुजलेला मृतदेह किडे खातात. शरीराच्या विघटनादरम्यान पहिल्यांदा आवाज करणार्या माशा ब्लो फ्लाईज पहिल्या टप्प्यात येतात. त्यानंतर विविध शिकारी किडे येतात, जे मोठ्या संख्येने अळ्या खातात. हे कीटक बहुतेक मऊ ऊतींचे सेवन करतात. काही कीटक त्वचा, केस, कूर्चा आणि हाडे खातात. केराटीन बिटल हे कीटक शेवटी येतात. ते त्वचेचा खूप खराब झालेला भाग खातात. त्यामुळे हा किडा न्याय वैद्यकशास्त्रास मदत करणारा ठरणार आहे. त्यामुळे मृतदेह किती काळापासून कुजलेल्या अवस्थेत आहे, याचा अंदाज बांधणे सोपे जाणार आहे.

## सगळे त्यांनीच उभे केले, मग ३२ वर्षे मी काय केले? : अजित पवार

**बारामती । प्रतिनिधी**

शुक्रवारी महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचार सभेत 'बारामतीच्या संस्था शरद पवार यांनी उभ्या केल्या', असे सांगणार्या युगेंद्र पवार यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समाचार घेतला. 'सगळे त्यांनीच उभे केले; मग ३२ वर्षे मी काय करीत होतो?' असा सवाल अजित पवार यांनी केला. शिवाय त्यांना आत्तापासूनच आमदारकीची स्वप्ने पडू लागल्याचा टोला त्यांनी लगावला.



युगेंद्र पवार यांचा नामोल्लेख न करता ते म्हणाले, मी खासदार झाल्यावर यांचा जन्म झाला आणि हे सांगताहेत की, बारामतीच्या सर्व संस्था शरद पवार यांनी उभ्या केल्या. मग आम्ही ३०-३२ वर्षे काय केले?

इंदापूर : लोकसभा निवडणूक झाली की विधानसभा निवडणुकीच्या वेळी महायुतीत जे ठरेल ते मी पाळेन. मी शब्दाचा पक्का आहे, असा माझा शब्द असून महायुतीचा उमेदवार निवडून द्या. पाच वर्षांत यापेक्षा अधिक निधी आणू, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी इंदापूर येथील भाजप कार्यकर्ता मेळाव्यात केले. इंदापुरात मी निधी द्यायला कमी पडणार नाही. मात्र, तुम्हीही घड्याळाच्या चिन्हासमोरील बटन कचाकचाकचा दाबा, असे ग्रामीण भाषेत बोललो. तेच पुण्यात असतो तर तिथे असा शब्दप्रयोग वापरला नसता. जिथे जी भाषा चालते त्याच भाषेत बोलावे लागते, असे पवार म्हणाले.

**पाटलांच्या घरी पवारांचे सहकुटुंब स्नेहभोजन**

अजित पवार यांनी भाजपचे नेते माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या निवासस्थानी स्नेहभोजन केले. सुनेत्रा पवार, पुत्र पार्थ आणि जय यांनी व हर्षवर्धन पाटील यांच्या पत्नी भाग्यश्री पाटील, कन्या अंकिता पाटील ठाकरे, निहार ठाकरे व राजवर्धन पाटील हेदेखील स्नेह भोजनप्रसंगी सहभागी झाले होते.